।। श्री रामेश्वर प्रसन्न ।। ।। श्री लिंगेश्वर प्रसन्न ।।
फोन नं. : २६७३ २७२६
मो. नं. : ९८६९१ ७०१९९

# फळसेवाडी हितकारी संस्था, (रजि. मुंबई)

द्वारा : कर्मचारी निवास, २/१४, शहाजी राजे भोसले, क्रिडा संकुल, जे. पी. मार्ग, अंधेरी (प.), मुंबई - ४०० ०५३.
रजि. क्र. : महाराष्ट्र शासन / एफ / १७१२९ / मुंबई / ९२

**मंगेश मनोहर राणे** अध्यक्ष | **सुनिल सदानंद राणे** सचिव | **उदय भगवान राणे** खजिनदार

दिनांक २८ एप्रिल २०१७.

सन्माननिय महोदय / महोदया,

फळसेवाडी हितकारी संस्थेने दिनांक १५ एप्रिल २०१७ रोजी आयोजित केलेल्या सभासदांच्या / ग्रामस्थांच्या विशेष सर्वसाधारण सभेस आपण उपस्थित राहून प्रस्तावांवर झालेल्या चर्चांमध्ये भाग घेतलात याबद्दल संस्था आपले हार्दिक अभिनंदन करते. संस्थेच्या सर्वसाधारण सभेस प्रथमच एवढ्या प्रमाणात असलेली उपस्थिती तसेच ग्रामस्थांची पत्राव्दारे आलेली निवेदणे / सुचना पाहता ग्रामस्थांची फळसेवाडी बद्दलची आस्था / तळमळ कायम असल्याची जाणीव कार्यकारीणीस झाली. कार्यकारीणीवर असलेल्या जबाबदारीची आम्हास जाणीव असून आपल्या विश्वासास कायम राहण्याचा तसेच आपल्या अपेक्षेनुसार संस्थेचा कारभार पारदर्शी ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे / राहिल.

या पत्राव्दारे दिनांक १५ एप्रिल २०१७ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचा कच्चा मसुदा फक्त सभेस उपस्थित सभासदांस / ग्रामस्थांस पाठवत असून सभेत करण्यात आलेल्या चर्चेच्या तसेच मंजूर प्रस्तावांच्या नोंदीसंबधी आपली काही निरिक्षणे / सुचना असल्यास आपण त्या श्री दशरथ दत्ताराम सातम यांचेकडे लेखी स्वरुपात किंवा इमेलव्दारे (dasharath@satam.co.in) दिनांक ३१ मे २०१७ पूर्वी पाठवाव्यात जेणेकरून श्री दशरथ दत्ताराम सातम आपली निरिक्षणे / सुचना संकलीत करून कार्यकारीणीच्या पुढील सभेत मांडू शकतील व योग्य त्या निरिक्षणांची सुचनांची दखल घेण्यात येऊन त्यानुसार अंतिम इतिवृत्त तयार करण्यात येईल. अंतिम इतिवृत्ताच्या प्रतीचे वितरण सर्व सभासदांस / ग्रामस्थांस करण्यात येईल.

सभासदांस / ग्रामस्थांस पुन्हा सुचना करण्यात येते की लेखी स्वरुपात किंवा इमेल व्यतिरिक्त आलेल्या सुचनांची नोंद ठेवणे व त्यानुसार इतिवृत्तात बदल घडविणे शक्य नसल्यामुळे आपण सुचविलेली निरिक्षणे / सुचना फक्त लेखी स्वरुपात / इमेलव्दारेच पाठवाव्यात.

आपण सभेस बहुसंख्येने उपस्थित राहून कार्यकारीणीचा हुरुप वाढविलात याबद्दल कार्यकारीणी आपली आभारी आहे.

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या वतीने

सु. स. राणे

(सुनिल सदानंद राणे)
सचिव

# इतिवृत्त – विशेष सर्वसाधारण सभा - आर्थिक वर्ष २०१७ – १८

दिनांक १७ एप्रिल २०१७

फळसेवाडी हितकारी संस्थेने आयोजित केलेली सभासदांची / ग्रामस्थांची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १७ एप्रिल २०१७ रोजी सायंकाळी ६:०० वाजता 'सोशल सर्व्हिस लीग शाळा', दामोदर हॉलजवळ, विठ्ठल चव्हाण मार्ग, परेल, मुंबई – ४०० ०१२ येथे विषयपटलावरील कामकाजा करीता सुरू करण्यात आली.

संस्थेचे २३ सभासद आणि १३ ग्रामस्थ असे एकूण ३६ सभासदांची / ग्रामस्थांची उपस्थिती आजच्या विशेष सर्वसाधारण सभेस असल्याची माहीती श्री सुनिल सदानंद राणे (सचिव) यांनी दिली. तसेच ७ सभासदांनी / ग्रामस्थांनी वैयक्तिक कारणांमुळे इच्छा असुनही सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे फोनव्दारे कळविल्याचे आणि फळसेवाडीत स्थानिक १३ ग्रामस्थांनी आपली मते पत्राव्दारे कळविल्याची माहितीही सचिवांनी उपस्थितांस दिली (सभेस उपस्थित राहीलेल्या सभासदांची / ग्रामस्थांची तसेच उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची / ग्रामस्थांची आणि आपली मते पत्राव्दारे नोंदविलेल्या फळसेवाडीत स्थानिक ग्रामस्थांची नावे परिशिष्ठ क्रमांक १ मध्ये दिली आहेत).

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या वतीने सचिवांनी विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थितांचे स्वागत करुन संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी आजच्या विशेष सर्वसाधारण सभेचे सभाध्यक्षस्थान स्विकारावे असा प्रस्ताव उपस्थित सभासदांपुढे ठेवला असता सचिवांनी मांडलेल्या प्रस्तावास सर्व उपस्थित सभासदांनी एकमताने अनुमोदन दिले.

---

श्री मंगेश मनोहर राणे यांनी सभाध्यक्षपद स्विकारुन या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थितांचे स्वागत केले. सभाध्यक्षानी उपस्थितांस माहिती दिली वेळअभावी विषयपटलावर असलेल्या ७ (पाच) विषयांवरच आज चर्चा करण्याचे प्रयोजन असुन याप्रकारे योजलेल्या कार्यक्रमास उपस्थितांनी सहकार्य करावे.

सभाअध्यक्षांनी त्यानंतर आजच्या विशेष सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरु करण्याची सचिवांना अनुमती दिली.

---

कार्यपटलावरील विषयावर चर्चा करण्यास सुरवात करण्यापूर्वी सचिवांनी उपस्थितांस सांगितले की आजच्या या सर्वसाधारण सभेपुढे फळसेवाडीतील १३ स्थानिक ग्रामस्थांकडून तसेच श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांचे कडून निवदने आली असून या निवेदनांमध्ये मांडलेल्या मुद्यांवर चर्चा प्रस्ताव चर्चा करतांना करण्यात येईल (सभासदांच्या माहीतीसाठी निवेदनांची प्रत अनुक्रमे परिशिष्ठ क्रमांक २ व परिशिष्ठ क्रमांक ३ व्दारे दिली आहे).

---

सचिवांनी विषय क्रमांक १ अंर्तगत माहीती दिली की सन २०१३ पासून संस्था गाडीतळ (तांबळ) ते श्री पांडूरंग सावजी राणे यांचे टेंबावरील घर येथपर्यंत वाहनरस्ता बनविण्याचा प्रयत्न करत असून याबाबत खुलासेवार माहिती प्रस्तावात दिलेली आहे.

श्री अभयनाथ भगवान साटम यांनी केलेल्या अडथळ्यामधून संस्था वेळोवेळी मार्ग काढण्याचा प्रयत्न करत असूनदेखील ग्रामपंचायतीच्या टाळाटाळीमुळे हा संपूर्ण रस्ता गाव नमुना २३ ला लावण्यात आलेला नाही. ग्रामपंचायतीने सुचविलेल्या उपायांस संस्था तयार असून ग्रामपंचायतीने सुचविलेल्या कागदपत्रांची पूर्तता आता करण्यात आलेली असल्यामुळे हा रस्ता लवकरच गाव नमुना २३ ला लागावयास हवा. परंतू यापूर्वीचा अनुभव पाहता श्री अभयनाथ भगवान साटम काही नवीन अडथळे उभे करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्री अभयनात भगवान साटम करत असलेले अडथळे तसेच ग्रामपंचायत करीत असलेली टाळाटाळ पाहता संस्थेतर्फे आता आपले नेते श्री नारायणराव तातू राणे साहेब तसेच स्थानिक आमदार श्री नितेश नारायणराव राणे साहेब यांस सामुहिक निवेदन देऊन हि बाब त्यांचे निर्दशनास आणून रस्त्याचे काम मार्गी लावण्याचा एक प्रयत्न व्हावयास हवा असे संस्थेस वाटते. तसेच या प्रयत्नांचा गावपातळीवर सतत पाठपुरावा व्हावा या उध्देशाने स्थानिक ग्रामस्थाची नेमणूक करण्याचा विचार असून त्यानुसार प्रस्ताव मंजूरीसाठी सभेपुढे ठेवले आहेत.

श्री प्रकाश ज्ञानदेव राणे यांनी श्री विरेन्द्र अनंत राणे यांचे प्रतिनिधी म्हणून सभेस सांगितले की श्री विरेन्द्र अंनत राणे यांनी श्री दशरथ दत्ताराम साटम यांचे हस्ते संस्थेकडे रु.१११,०००/- इतकी रक्कम या वाहनरस्त्याच्या कामासाठी देणगी म्हणून सप्टेंबर २०१३ साली दिलेली होती. आता साडेतीन वर्षे उलटून गेल्यावरही त्या देणगीचा वापर कसाकाय झाला याबाबत त्यांना संस्थेकडून किंवा कोणाकडूनही काहीही माहीती आलेली नाही. श्री विरेन्द्र अंनत राणे यांची हा रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावा हि अपेक्षा व्यक्त केली असून श्री विरेन्द्र राणे यांस वैयक्तिक कारणांमुळे आजच्या सभेस उपस्थित राहता आले नाही परंतू संस्थेस काही माहीती द्यावायाची / खुलासा करावयाचा असल्यास ते फोनवर उपलब्ध असतील असे श्री प्रकाश ज्ञानदेव राणे यांनी सांगितले. श्री विरेन्द्र अंनत राणे यांच्या वयोवृध्द आईची एकदा तरी गावी जाण्याची इच्छा असून हा रस्ता पूर्ण झाल्यास त्यांस त्यांच्या आईची इच्छा पूर्ण करता येईल परंतू सध्या बनविलेल्या कच्या वाहनरस्त्यावरून वाहन घेऊन जाणे कठीण असल्यामुळे ते आईची इच्छा आजतरी पूर्ण करू शकत नाहीत असे श्री प्रकाश ज्ञानदेव राणे यांनी सांगितले.

श्री विरेन्द्र अंनत राणे यांचेकडून मोठी देणगी मिळाल्यानंतर त्यांचेबरोबर काहीही पत्रव्यवहार करण्यात आला नाही तसेच त्यांस वाहनरस्त्याच्या प्रगतीची काहीही माहीती देण्यात आली नाही याबाबत संस्थेच्या वतिने सचिवांनी दिलगीरी व्यक्त केली.

सचिवांनी पुढे माहिती दिली की श्री विरेन्द्र राणे यांचेकडून आलेल्या देणगीची रक्कम प्रथम संस्थेच्या खात्यात जमा करण्यात आली नंतर वाहनरस्त्याचा खर्च संस्थेच्या माध्यमातूनच करण्यात आला आहे. श्री विरेन्द्र राणे यांस आज / आता फोनव्दारे माहीती देणे योग्य नसून त्यांस प्रत्यक्ष भेटून वाहनरस्त्यासाठी येत असलेल्या अडथळ्याची माहीती, संस्था करत असलेल्या प्रयत्नांची माहीती त्याचबरोबर या वाहनरस्त्यासाठी आतापर्यंत करण्यात आलेला खर्च याचीही माहिती लवकरात लवकर देण्यात येईल असे आश्वासन सचिवांनी दिले. सचिवांनी पुढे माहिती दिली की आतापर्यंत झालेल्या प्रगतीचा आढावा घेता तसेच ग्रामपंचायतीने मागितलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करण्यात आल्यामुळे हे काम लवकरच मार्गी लागण्याचे अपेक्षा आहे.

त्यांनतर स्थानिक ग्रामस्थ निवडण्याच्याबाबत झालेल्या चर्चेदरम्याण उपस्थित स्थानिक ग्रामस्थ श्री संकेत रत्नाकर राणे यांचे नाव उपस्थिताकडून सुचविण्यात आले.

**मंजूर प्रस्ताव**

१. तावडेचिंच ते तांबळ (देवाचा आंबा) या फळसेवाडी मुख्य रस्त्यातील विभागाचे डांबरीकरण करणे तसेच तांबळ (गाडीतळ) ते श्री पांडुरंग सावजी राणे यांचे टेंबावरील घर येथपर्यंत बनविलेला संपूर्ण वाहनरस्ता गाव नमुना २३ ला लावून व या रस्त्याचे खडीकरण शक्य तितक्या लवकर व्हावे यासाठी आपले नेते श्री नारायणराव तातू राणे तसेच स्थानिक आमदार श्री नितेश नारायणराव राणे यांस सामुहिक निवेदन द्यावे.

२. वाहनरस्त्यासाठी चालविलेल्या प्रयत्नांना स्थानिक पातळीवरून सतत पाठपूरावा व्हावा तसेच या कामाबद्दल होत असलेली प्रगती किंवा या कामात येत असलेले अडथळ्यांची वेळचेवेळी संस्थेस माहीती व्हावी जेणेकरून आवश्यक ती कार्यवाहीची योजना तातडीने आखता येऊ शकेल या दृष्टीने स्थानिक ग्रामस्थ म्हणून श्री संकेत रत्नाकर राणे यांचे नावास मंजूरी देण्यात आली.

३. श्री अभयनात भगवान साटम यांस समज देण्याची कारवाई तसेच त्यांचे सभासदत्व रद्द करण्याबाबतची कारवाई संबधी निर्णय पुढील सर्वसाधारण सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.

---

सचिवांनी सांगितले की विषय क्रमांक २ अंर्तगत मांडण्यात येणारया नळयोजनेसंबधी सविस्तर माहीती प्रस्ताव क्रमांक २ मध्ये दिलेली असून ही योजना मार्गी लावण्यासाठी उपस्थितांच्या मंजूरीची आवश्यकता आहे. ही योजना मार्गी लागल्यास आपणांस पैलाडहून मिळणारया पाण्यावर (जे नेमक्या वेळी उपलब्ध नसते) अवलंबून राहावे लागणार नाही. या संपूर्ण योजनेस जवळपास रु.७००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून निधी उभारण्यास वेगवेगळे मार्ग प्रस्तावात दिलेले आहेत. सचिवांनी उपस्थितांस विनंती केली आपण वाडीच्या विकासासाठी हा प्रकल्प यशस्वी करूनच दाखवुया.

सचिवांनी सांगितले की स्थानिक ग्रामस्थांनी १३ ग्रामस्थांच्या स्वाक्षरीसहित पाठविलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की झरीवर ४ वेळा सर्वेक्षण झालेले असल्यामुळे त्याच जागेवर परत सर्वेक्षण करण्यासाठी रु.३५,०००/- इतकी रक्कम खर्च करणे चुकीचे आहे. तसेच वाडीत कोठे पाणीसाठा मिळू शकेल व पाण्याची दिशा कशी आहे हे माहित करण्यासाठी स्थानिकांना विश्वासात घेणे गरजेचे आहे.

यावर झालेल्या चर्चेत अध्यक्ष व श्री दशरथ साटम यांनी खुलासा केला की वाडीत पाण्याचा साठा कोठे होता तसेचे पाण्याची दिशा कशी आहे याची माहिती ग्रामस्थांकडूनच मिळू शकेल त्यामुळे ग्रामस्थांचा विचार सर्वेक्षणापूर्वी घेण्यात येईल. तसेच ४ वेळा केल्या गेलेल्या सर्वेक्षणानंतर त्याच जागी परत सर्वेक्षण करू नये ही बाब पदाधिकारी जाणतात परंतू संस्थेच्या दप्तरी मागिल सर्वेक्षणाची नोंद नाही तसेच सर्वेक्षणाचे अहवालही उपलब्ध नाहीत. आत करण्यात येणारे सर्वेक्षण सध्या उपलब्ध असलेल्या अद्यावत तंत्रज्ञानानुसार असून या सर्वेक्षणाचा लिखित अहवाल आपणांस उपलब्ध होईल. आवश्यकता भासल्यास केलेल्या सर्वेक्षणाची आय आय टी पवई, मुंबई येथील तज्ञांकडून पडताळणी करवून त्यांचा अहवालही आपणांस उपलब्ध केला जाईल.

त्यानंतर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी माहीती दिली की सर्वेक्षणासाठी सुचविलेली आलेली मे. टेरा हायड्रोटेक सोल्युशन ही संस्था गोव्यातील असून त्यांनी मडकई, गोवा येथील माळरानावर काही कंपण्यांसाठी बोअरवेलची कामे केली असून त्यापैकी एक-दोन कंपन्यांचे संचालक परिचयाचे असल्यामुळे त्याचेकडून या संस्थेच्या कामाबद्दल मिळालेली माहीती समाधानकारक आहे. तसेचे या संस्थेने दिलेले दर वाजवी असल्यामुळे निविदा मागविण्यात आलेल्या नाहीत. जरी रु.३५,०००/- हि रक्कम मोठी वाटत असली तरी मागील अनुभव पाहता पुन्हा एकदा सर्वेक्षण करणे गरजेचे वाटत असल्यामुळे, सर्वेक्षण करून संस्थेकडे कायमस्वरुपी नोंद / रेकार्ड निर्माण करणे गरजेचे आहे. सर्वेक्षण सुरू करण्यापूर्वी सर्वेक्षण करणारया संस्थेच्या प्रतिनिधीस ग्रामस्थ त्याचे प्रश्न / शंका विचारून त्याचे निरसन करून घेऊ शकतील. तसेच आवश्यकता भासल्यास झरी व्यतिरिक्त इतर जागांचेही सर्वेक्षण करावे का ? याचा विचार सर्वेक्षणादरम्याण करता येईल. ही संपूर्ण योजना / प्रकल्प ग्रामस्थांसाठीच असल्यामुळे सर्वांचा सहभाग व सहाय्य असल्याशिवाय याची पूर्तता होऊ शकणार नाही.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की सर्व सभासदांना / ग्रामस्थांना आपली मते मांडता यावीत यासाठीच फळसेवाडी हितकारी संस्थेचे व्यासपीठ आहे. या व्यासपीठावर मांडलेली स्पष्ट मते हा वाद किंवा विरोध नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी त्यांनी पत्रव्दारे मांडलेली त्यांची मते कार्यकारीणी ग्रामस्थांचा विरोध आहे असे समजत नाही. तसेच या व्यासपीठावर झालेल्या चर्चेमुळे बरीच माहीती नवीन / तरुण ग्रामस्थांस उपलब्ध होईल व विचारांची देवान-घेवान होईल आणि विचारमंथन व चर्चेच्या माध्यमातून, तडजोडीतून आपण सर्वमान्य मार्ग काढून विकासाकडे वाटचाल करू.

त्यानंतर सचिवांनी श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांनी निवेदनामार्फत मांडलेल्या मुद्यांबाबत माहीती दिली. श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांनी मांडलेले मुद्दे संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे आहेत (श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांनी दिलेले निवेदन परिशिष्ठ क्रमांक २ मध्ये दिले आहे).

१. ब्राह्मण देवाची विहिर अतिपवित्र मानली जात असल्यामुळे तसेच ब्राह्मण देवावर ग्रामस्थांची दृढ श्रध्दा असल्याकारणे तिचे पाणी पंपाव्दारे उपसून नळ योजनेव्दारे पुरविण्याचा विचार करू नये.
२. दरदिवशी १०,००० लिटर पाणी विहिरीतून पंपाव्दारे उपसून त्यांने गावाची तहान भागविण्याचा विचार घातक आहे. विहिरीतील पाणी पंपाव्दारे सतत उपसल्यास पाणीसाठा पुर्ववत राहील याबाबत कोणता शास्त्रीय आधार आहे का ?
३. संस्था पाण्याची निर्मिती करू शकत नसल्यामुळे संस्थेस पाण्याचा उपसा करण्याचा नैतिक अधिकार नाही.
४. विहिरीत असलेले नैसर्गिक झरे पाणी पंपाव्दारे उपसल्यामुळे आटले किंवा नष्ट झाले तर त्याची जबाबदारी पदाधिकारी, कार्यकारीणी व या योजनेचे समर्थन करणारे ग्रामस्थ घेतील काय व संबधीत व्यक्ती लेखी आश्वासन देतील काय ?
५. सर्वेक्षणासाठी नेमणूक करण्यासाठी संस्थेने निविदा मागविण्याचा मार्ग का अवलंबिला नाही. सार्वजनिक कामात पारदर्शकता महत्वाची असताना कार्यकारीणीने ते न केल्यामुळे संस्था / कार्यकारीणी गावकरयांची फसवणूक करत नाही का ?
६. वारंवार पाणी उपसा झाल्यामुळे आजुबाजूच्या गावातील / प्रदेशातील भुगर्भीय पातळी एकतर आटली किंवा नष्ट झाली असल्यामुळे संस्था योजत असलेले उपाय भविष्याच्या दृष्टीने अतिशय घातक आहेत.
७. गावात वेगवेगळ्या ठिकाणी पाण्याच्या पातळीत फरक असल्यामुळे विहिरीतून पाणी उपसण्याऐवजी आपण इतर स्त्रोतांची का चाचपणी करत नाही.

वरील मुद्दे मांडल्यावर श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांनी खालील पर्याय सुचविले .

१. पाण्याची भुगर्भीय पातळी वाढावी यासाठी प्रथम प्रयत्न केले जावेत.
२. काही तज्ञांशी चर्चा करून शेततळी, लहान बंधारे बांधण्याचा प्रयत्न करण्यात यावा. त्यांच्या ओळखीचे काही तज्ञ असून त्यांनी राज्य तसेच देशपातळीवर अश्या प्रकल्पांना मार्गदर्शन केले आहे. संस्थेस या तज्ञांशी चर्चा करावयाची असल्यास त्या त्यांचे संर्पक क्रमांक संस्थेस देऊ शकतील.
३. अश्याप्रकारे राबविल्या जाणारया प्रकल्पांस सरकारतर्फे अनुदान व प्रोत्साहन दिले जात असून त्याची माहीती करून घेऊन एन.जी.ओ. किंवा दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात यावेत.

श्री मंगेश मनोहर राणे (अध्यक्ष), श्री सुनिल सदानंद राणे (सचिव) आणि श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी खुलासा करतांना सांगितले की आम्ही सर्व पदाधिकारी फळसेवाडी ग्रामस्थ असल्यामुळे ब्राम्हणाच्या विहिरीचे / ठिकाणाचे पावित्र्य आम्हास ज्ञात आहे. ब्राम्हणाच्या विहिरीचे पावित्र्य कळशीऐवजी पंपाने पाणी उपसल्याने भंग होणार नाही. तसेच संस्था वाडीतील वयोवृध्द ग्रामस्थांच्या घरापर्यंत नळयोजनेव्दारे पाणी पोहोचविण्याचे पवित्र कार्य करत आहे. त्यानंतर सचिवांनी मत मांडले

कि जर गंगा नदीच्या पावित्र्याचे भान राखुनही नदीच्या पाण्याचा पंपाव्दार उपसा केला जातो तर ब्राम्हणाच्या विहिरीतील पाण्याचा उपसा का होऊ नये.

दुसरा मुद्दा ब्राम्हणाचे विहिरीतून पाणीसाठा नष्ट होण्याबाबत, प्रस्तावात नमुद केल्यानुसार आपण दरदिवशी केवळ ५,००० लिटर ते १०,००० लिटर पाणी उपश्याचा विचार करत आहोत. आपणांस पाणीपातळी वाढत नसल्याचे किंवा पाणी ठरावीक पातळीच्या खालीच राहील्याचे निर्दशनास आल्यास आपण पाणी उपश्याचे तसेच पाणीवाटपाचे नियोजन करून शेवटचे ३ ते ४ महिने पाणीउपसा कमी करू शकतो. तसेच गरज भासल्यास व निधी उपलब्ध झाल्यास ब्राम्हणविहिरीचा पाणीसाठा वाढविण्यासाठी विहिरीचा घेर दुप्पट करू शकतो. आपण पाणीपुरवठा योजनेसाठी ब्राह्मण देवाच्या विहिरीचाच विचार करत नसून इतर स्त्रोत जसे विंधनविहीर याचाही विचार करत असल्यामुळे त्याबाबत सर्वेक्षण करत आहोत. विंधन विहीरीचा पर्याय उपलब्ध झाल्यास ब्राह्मण विहिरीवरील ताण कमी होऊ शकतो.

श्री तृप्ती राणे यांस पुढे सांगण्यात आले की सध्या फक्त धडधाकट ग्रामस्थ विहिरीवर जाऊन कळशीने पाणी काढतात, वयोवृध्दांना या धडधाकटांवर अवलंबून राहावे लागते त्यामुळे धडधाकटांचा बराच वेळ फक्त पाण्याची ने-आण करण्यासाठी खर्च होतो हे योग्य आहे का ? आपण त्यांच्या वेळेची बचत करून ती वेळ विधायक कार्यास लावल्यास विकासकामे करता येणार नाहीत का ?

आजही विहिरीतून पाण्याचा उपसा गरजेसाठी होत आहे, पंप योजनेव्दारे नळामार्फत पाणीपुरवठा ग्रामस्थांच्या गरजेसाठीच केला जाणार आहे. ब्राम्हणाच्या विहिरीतून नळयोजनेव्दारे करण्यात येणारया पाण्याव्दारे शेती, बागकाम करणे अपेक्षित असून ग्रामस्थांसाठी त्याप्रमाणे नियमावली तयार करून त्याची कठोरपणे अंमलबजावणी केली जाईल याची ग्रामस्थांनी खात्री बाळगावी. आपल्याप्रमाणे आम्हीही फळसेवाडीतील ग्रामस्थ असल्यामुळे कोणतीही गोष्ट नष्ट करण्याची इच्छा आम्ही कशी काय बाळगू ?

श्रीमती तृप्ती राणे यांस पुढे सांगण्यात आले की कार्यकारीणीने ब्राह्मण देवाच्या विहिरीतील पाण्याचा उपसा करून पाहणी केल्यानंतर दिनांक १८ मार्च २०१७ रोजी सभासदांस / ग्रामस्थांस पाठविलेल्या परिपत्रकामध्य नमुद केले होते की मे. टेरा हायड्रोटेक सोल्युशन, दाबोलिन, गोवा येथील श्री स्मितेश तलावडेकर यांस चर्चेसाठी बोलविण्यात आले होते व चर्चेदरम्याण त्यांस सर्वेक्षण करण्यासाठी येणारया खर्चाचे अंदाजपत्र तसेच बोअरवेल खणावयाची ठरल्यास येणारया खर्चाचे अंदाजपत्र देण्याची सुचना करण्यात आली होती. त्याच परिपत्रात सर्वसाधारण सभा घेऊन ठेकेदारांची नियुक्ती इत्यादी बाबींवर विचार करण्याचे कळविण्यात आले होते. वरील परिपत्राच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये स्पष्ट नुमद करण्यात आले होते की फळसेवाडी हितकारी संस्था करत असलेल्या कामगिरीची ग्रामस्थांस पुर्वकल्पना असावी या उद्देशाने सदरहू पत्रक वितरीत करत असून ग्रामस्थांना आवाहन करण्यात येते की संर्दभित विषयांवर ग्रामस्थांस काही सूचना / मार्गदर्शन करावयाचे असल्यास त्यांनी त्या लेखी स्वरुपात अध्यक्ष व सचिवांकडे पाठवाव्यात.

दिनांक १८ मार्च २०१७ रोजी वितरण केलेल्या पत्रकातील बाबी विचारात घेता कार्यकारीणी ग्रामस्थांची कशी काय फसवणूक करीत आहे ही विचारणा श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांस करण्यात

आली. कार्यकारीणीने जरी या छोट्या कामासाठी निवदा मागविण्याच्या मार्गाचा अवलंब जरी केला नसला तरी मे. टेरा हायड्रोटेक सोल्युशन च्या प्रवर्तकांची पात्रता, त्यांनी यापूर्वी केलेली कामे तसेच त्यांनी अंदाजपत्रात नमुद केलेले दर यांची पडताळणी केल्यानंतर ते समाधानकारक वाटल्याने त्यांची नेमणूक सर्वक्षणासाठी करण्याचा विचार मांडला आहे.

श्रीमती तृप्ती  अविनाश राणे यांस पुढे सांगण्यात आले की संस्था ब्राम्हणाच्या पाण्याचा उपसा करण्याबरोबरच पाण्याच्या इतर स्त्रोतांची चाचपणी करत असून त्या अंर्तगतच विंधनविहीरीसाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे व त्यासाठीच तर मे. टेरा हायड्रोटेक सोल्युशन या संस्थेची निवड करण्याचा विचार आहे.

कोकणात जास्त पाऊस पडून देखील तिव्रउतारामुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता वाहून जात असल्यामुळे भुगर्भिय पाण्याची पातळी कमी होत आहे. त्याचबरोबर गेल्या २ ते ३ दशकात बेसुमार जंगलतोड झाल्यामुळे पावसाचे प्रमाण कमी कमी होत असून पाण्याचा निचरा वेगाने झाल्यामुळे भुगर्भिय पाण्याची पातळी खाली जात आहे. परंतू आजतरी आपल्याकडे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष नाही फक्त उपलब्ध असलेले पाणी राहत्या वस्तीपासून दुर असल्यामुळे व बदलत्या राहणीमानानुसार ते पाणी ग्रामस्थांपर्यंत पोहोचवावे (वेळी अवेळी न मिळता ठरावीक वेळापत्रकानुसार) व त्यांचे पाणी वाहण्याचे श्रम शक्य तितके कमी व्हावे हा विचार कार्यकारीणीने केला आहे. नागरिकांचे रहिवाश्यांचे श्रम कमी करण्याचे तसेच त्यांचे राहणीमान उंचाविण्याचे असे प्रयत्न सर्वत्र होत असतात.

आपण सुचविल्यानुसार भुगर्भिय पाण्याची पातळी  वाढविण्याचा प्रयत्न व्हावयासच हवा तसेच आपण सुचविलेले उपायही कार्यकारीणीस मान्य आहेत. भुगर्भिय पाण्याची पातळी वाढवायसच हवी परंतू आपण प्रथम पाणीपातळी वाढवायची व त्यानंतर नळयोजना राबवायची  असा जो प्राधान्यक्रम सुचवित आहात तो व्यावहारीक वाटत नाही कारण  आपण सुचविलेल्या उपायांस भांडवली खर्च तसेच भरपूर श्रमदानाची गरज असून त्यांचे परिणाम कमीतकमी २ ते ३ वर्षानंतर दिसू लागतील.

आपण सुचविलेले भुगर्भिय पाणीसाठा वाढविण्याचे प्रयत्न संस्था समांतररित्या करणारच आहे त्यामुळे २ ते ३ वर्षात पाणी उपश्यामुळे कोकणातील किंवा आपल्या वाडीतील भुगर्भिय पाणीसाठा आटण्याचा किंवा नष्ट होण्याचा धोका वाटत नसल्यामुळे कार्यकारीणी प्रथम नळयोजना राबविण्याचा प्रयत्न करत असून आपण सुचविलेले उपाय जशीजशी निधीची  / भांडवलाची उभारणी होईल त्यानुसार हाती घेण्यात येतील याची  आपण खात्री बाळगावी.

अनुदान / देणगी मिळविण्यासाठी आपण सुचविल्यानुसार एन जी ओ किंवा दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून प्रयत्न केले जावेत हे बरोबर असून त्यानुसार प्रस्तावात मुद्दा मांडलेला आहे. परंतू गेली कित्येक वर्षे प्रयत्न करुनही देणगी मिळविण्यास प्रतिसाद मिळालेला नाही याचे कारण आपली संघटीत शक्ति फारच कमी असून उच्चपदस्थ ग्रामस्थांचा संस्थेत सहभाग नसल्यामुळे देणगी / अनुदान मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न अपुरे पडतात. प्रथम सभासद संख्या वाढवून संघटीत शक्ति वाढवून स्थानिक आमदार / सरकार / ग्रामपंचायत यांचेकडे प्रयत्न करावयास हवेत.  श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांस विनंती करण्यात आली कि आपण एन जी ओ  तसेच दानशूर व्यक्ती आणि सरकार

पातळीवरुन निधी मिळविण्यासाठी मार्गदर्शन करावे जेणेकरून आपले उध्दीष्ट साध्य करता येऊ शकेल.

परंतू वरील सर्व खुलाश्याने श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी त्यांचा आक्षेप / विरोध कायम ठेवला. त्यांचे ठाम निर्णयामुळे सार्वमताने निर्णय होत नसल्यामुळे अजून कोणा उपस्थिताचा श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांचे विचारास पाठींबा आहे का ? अशी विचारणा करण्यात आली असता श्री भरत गणपत राणे यांनी श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांचे विचारांस पाठींबा दर्शविला. उपस्थित ३६ सभासद / ग्रामस्थांपैकी फक्त २ सभासद / ग्रामस्थांचा आक्षेप असल्यामुळे कार्यकारीणीने मांडलेला प्रस्ताव मंजूरीकरीता उपस्थितांपुढे मांडल्यावर उपस्थितांनी श्रीमती तृप्ती अविनाश राणे व श्री भरत गणपत राणे यांच्या आक्षेपांची नोंद घेऊन कार्यकारीणीने मांडलेले प्रस्ताव मंजूर केले.

**<u>मंजूर प्रस्ताव</u>**

१. मे. टेरा हायड्रोटेक सोल्युशन या संस्थेची निवड करून झरीवरील १० एकर जमीनीचे सर्वेक्षण करण्यात यावे व त्यासाठी होणारा खर्च (रु.३५,०००/-) फळसेवाडी हितकारी संस्थेच्या उपलब्ध फंडातून करण्यात यावा.

२. नळयोजनेसाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद खालील मार्गांनी करण्यात यावी –
   a. जुन्या सभासदांकडून २००६ -०७ ते २०१६ -१७ (११ वर्षे) याकाळातील थकबाकी रक्कमेची रु.६६०/- (रु.६०/- वार्षिक) मागणी करण्यात यावी.
   b. नविन नोंदणी होणाऱ्या सभासदांस विनंती करुन २०१७ – १८ या वर्षाची वार्षिक वर्गणी रु.६००/- (नविन दराने) घेण्यात यावी.
   c. ग्रामस्थ, स्थानिक व इतर नेतेमंडळी तसेच दानशूर व्यक्ती त्याचप्रमाणे माननिय आमदार श्री नितश नारायणराव राणे साहेब आणि आदरनिय नेते श्री नारायणराव तातू राणे साहेब यांचेकडून देणगी स्वरुप आर्थिक सहाय्या मिळविण्याचा प्रयत्न करण्यात यावा.
   d. वरील माध्यमातून निधी उभा न होत असल्यास प्रत्येक विभक्त कुटूंबामागे रु.१६,०००/- अशी वर्गणी फळसेवाडी पाणी पुरवठा योजनेखाली बसविण्यात यावी. या वर्गणीचा भराणा २४ महीण्यात करण्याची सवलत ग्रामस्थांना देण्यात यावी.
   e. त्याबरोबर वर्गणीचा भराणा होईपर्यत किंवा देणगी जमा होईपर्यंत कोणी ग्रामस्थ व्याजमुक्त किंवां सवलतीच्या दरात कर्ज देण्यास तयार आहे का ? याची विचारणा करण्यात यावी.
   f. वरीलपैकी कोणत्याही मार्गाने पुरेसा निधि उभा होऊ शकत नसल्यास बैंकेकडून कर्ज मिळू शकेल का ? याची शक्यता अजमावून सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मांडण्यात येऊन त्याची मंजूरी मिळविण्यात यावी.

३. जशी जशी निधीची उभारणी होईल त्यानुसार खालील टप्यानुसार काम करण्यात यावे.

a. पहिल्या टप्प्यात श्री शंकर बाळकृष्ण राणे यांची संम्मती मिळवून झरीवरील त्यांचे जमीनीवर पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यात यावे.
b. दुसरया टप्प्यात मे. टेरा हायड्रोटेक सोल्युशन यांनी सर्वेक्षणादरम्याण सुचविलेल्या योग्य जागेत विंधनविहिर / कुपनलिका खोदण्याचे काम करण्यात यावे.
c. तिसरया टप्प्यात पाण्याचे टाकीपासून प्रत्येक ग्रामस्थांच्या घरापर्यंत १८ मी.मी. ची पाईपलाईन टाकण्यचे काम करण्यात यावे.
d. चवथ्या टप्प्यात ब्राह्मण विहिरीपासून पाण्याच्या टाकी पर्यंत १८ मी.मी ची पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात यावे.
e. शेवटच्या टप्प्यात ब्राम्हणदेवाच्या विहिरीवर पंप बसविण्यात यावा.

४. नळयोजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात आल्यास ग्रामपंचायतीकडून मिळणारा निधी सभासदांच्या परवानगीने संस्थेच्या इतर विधायक कार्यांसाठी वापरण्यात यावा.

---

सचिवांनी विषय क्रमांक ३ सभासदांपुढे मांडताना निवेदन केले की सध्या वाडीवर असलेली सार्वजनिक दिवाबत्तीची सोय अपूरी असल्याकारणे तसेच वाडीतील रस्त्यांवर पथ-दिपांची सोय नसल्यामुळे अंधारल्यावर वाडीवर ये-जा करणे त्रासदायक होते, पावसाळ्याचे महिण्यात ही परिस्थिती फार धोकादायक असते. ग्रामपंचायतीकडून देण्यात आलेले सोलर दिवे त्यांची वेळच्यावेळी देखभाल केली गेली नसल्यामुळे नादुरुस्त आहेत. तसेच लाईटपोलवर लावण्यात आलेले सी एफ एल दिवे देखील बरयाच वेळा बंद किंवा नादुरुस्त असतात याकारणे फळेसेवाडी हितकारी संस्था सार्वजनिक दिवाबत्ती आणि पथ-दिपांची व्यवस्था करण्याची योजना तसेच त्यांची देखभाल संस्थेमार्फत करण्याच्या विचारात आहे.

या योजनेवर चर्चा करताना श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांनी सार्वजनिक दिवाबत्तीची योजना सरकारी योजनामार्फत तसेच सोलर व पाण्याच्या विजेवर विजनिर्मिती अश्या पर्यायाचा विचार करुन करण्यात यावी अशी सूचना केली. श्रीमती तृप्ती राणे यांनी पुढे सूचना केली की देणगीदारांच्या माध्यमातून आपणांस सोलर कंदिल किंवा सोलर टॉर्च मिळविण्याचा प्रयत्न करावयास हवा. तसेच काही सामाजिक संस्थांशी चर्चा करुन इतर पर्याय आहेत का ? हे पाहावयास हवे.

यावर सचिवांनी सांगितले की सतत पाठपुरावा केल्यावर उपसरपंचानी मे महिण्यापर्यंत २ सोलर दिवे देण्याचे आश्वासन दिले आहे. सोलर व पाण्यावर विजनिर्मिती करण्यासाठी भरमसाठ भांडवली खर्च येत असल्यामुळे असा प्रयत्न फक्त सरकारी योजनांमधून सहाय्य मिळाल्यासच राबविता येऊ शकेल. संस्थेकडे सभासदसंख्या नसल्यामुळे अश्या प्रकारच्या योजना आपल्या विभागाकडे वळवितांना संघटीत बळ कमी पडते. ग्रामपंचायती सारखी गावपातळीवरील संस्था देखील आपल्या मागण्यांवर वेळखाऊ धोरण अवलंबून संस्थेच्या योजनांना प्रतिसाद देत नाही.

संस्थेकडे हक्काचे देणगीदार नसल्यामुळे संपूर्ण योजना तयार करून देणगीदार शोधण्यापासुन सुरवात करावी लागेल व त्यास कोण, कधी व किती प्रतिसाद देतील याचा अंदाज नसल्यामूळे

अशीप्रकारे योजनेची आखणी करणे व्यवहारीक वाटत नाहीत. सर्व ग्रामस्थांनी सार्वजनिक दिवाबत्तीची बाब मनात आणली तर ही योजना आपण स्वत:च्या ताकदीतून मार्गी लावू शकतो अशी संस्थेस खात्री आहे. आज प्रत्येकजण आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्यामुळे या छोट्या छोट्या बाबींसाठी कोणाकडे हात पसरणे योग्य नाही. तरीही कोणा ग्रामस्थाचा काही रक्कम देणगीव्दारे संस्थेस देण्याचा मानस असल्यास किंवा कोण ग्रामस्थ एकादा देणगीदार या कामासाठी मिळवू शकल्यास संस्थेचे पदाधिकारी त्यास भेटण्यास तयार आहेत तसेच अश्या देणग्यांचे संस्था कधीही स्वागतच करेल.

सचिवांनी पुढे सांगितले की श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी काढलेल्या अंदाजानुसार या बाबीसाठी खालील तक्त्यामध्ये दिल्यानुसार रु.१००,०००/- पर्यत खर्च येऊ शकतो. तसेच ही योजना जशी जशी निधीची उभारणी होईल त्यानुसार मार्गी लावू शकतो.

| | | ४० वॅट लाईट | | ६० वॅट लाईट |
|---|---|---|---|---|
| LED Lights (CISCA make) - ८ नग | रु.५,५०० नग | ४४,००० | रु.७,७०० नग | ६१,६०० |
| Timer Switch (L & T make) – २ नग | रु.६,००० नग | १२,००० | रु.६,००० नग | १२,००० |
| 2.5 x 2 Core Copper Armoud Wire – ३०० मीटर | रु.९० / मीटर | २७,००० | रु.९० / मीटर | २७,००० |
| **एकूण खर्च** | | ८३,००० | | १००,६०० |

वरील खर्चात लाईट पोलचा खर्च व वायरमनची मजूरी धरलेली नाही.

त्यानंतर सचिवांनी प्रस्ताव मंजूरीकरता सभेपुढे मांडले.

**<u>मंजूर प्रस्ताव</u>**

१. वाडीवर सार्वजनिक दिवाबत्ती तसेच पथ-दिप लावण्यासाठी सोईस्कर व योग्य अश्या ८ (आठ) जागांची निवड करावी. जागांची निवड करताना स्थानिकांच्या विचाराना प्राधान्य द्यावे.
२. उपसरपंचानी दिलेल्या आश्वासनाचा पाठपूरावा करून ग्रामपंचायतीकडून दोन सोलर दिवे मे महिण्यापर्यंत मिळविण्यात यावेत.
३. जशी-जशी निधीची उपलब्धता होईल त्यानुसार सार्वजनिक दिवाबत्ती तसेच पथ-दिपांच्या योजनेची अंमलबजावणी करावी.

---

सचिवांनी विषय क्रमांक ४ मार्फत मांडण्यात येणारया प्रस्तावांची माहिती देताना सांगितले की आपली संस्था गेली ८ दशके (जवळपास ८० वर्षे) अस्तित्वात असूनदेखील सभासद संख्या ८० देखील नाही. फळसेवाडीशी संबधीत ग्रामस्थांची संख्या ५०० ते ६०० असून संस्थेची सभासदसंख्या इतकी कमी असल्याचा खेद नेहमीच होत असतो. गेली १० ते ११ वर्षात नवीन सभासद नोंदणी करण्याचा प्रयत्न झालेला नाही. या काळात सभासद असलेल्या २० ते २२ ग्रामस्थांची देवाज्ञा झालेली असल्यामुळे सभासद संख्या रोडावली आहे. संस्थेची रोडावलेली सभासदसंख्या ही गंभीर बाब असून यावर वेळीच उपाययोजना करण्यात आली नाही तर संस्था नामशेष होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सचिवांनी पुढे सांगितले की फळसेवाडी हितकारी संस्था हे फळसेवाडीशी संबधीत ग्रामस्थांचे एकत्र येण्याचे व्यासपीठ असल्यामुळे ही संस्था चालू ठेवणे हे ग्रामस्थांच्या हिताचे आहे. फळसेवाडी हितकारी संस्था कार्यक्षम व्हावी, संस्थेत नवीन विचारांचा / मनुष्यबळाचा सामावेश व्हावा आणि फळसेवाडीच्या विकासास चालना मिळावी यासाठी प्रथमत: संस्थेच्या सभासदसंख्येत वृध्दी होणे आवश्यक आहे. या सर्वकारणे विषय क्रमांक ४ व्दारे काही प्रस्ताव मंजूरी करीता सभेपुढे ठेवण्यात येत आहेत.

यावर झालेल्या चर्चेत श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांनी भाग घेताना संस्थेचा कारभार स्वच्छ व पारर्दशी नसल्याची खंत व्यक्त करून ग्रामस्थांना सभासदत्व स्विकारण्याचे आवाहन करण्यापूर्वी त्यांस व्यवहार स्वच्छ व पारदर्शी असतील असा विश्वास संस्था देऊ शकेल का ? अशी विचारणा केली. तसेच संस्थेमार्फत यापूर्वी करण्यात आलेल्या कार्यक्रमांचा व संस्थेच्या कामकाजाचा हिशेब अजुनही सभासदांपुढे का मांडण्यात येत नाही अशी विचारणा केली.

त्यापुढे श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांनी प्रस्तावात आर्थिक वर्ष २०१६ -१७ पर्यंतची जमा न झालेली सभासद वार्षिक वर्गणी गंगाजळी टाकण्यास मंजूरी मागितलेली आहे याबद्दल आश्चर्य व्यक्त करून त्याबाबीस विरोध दर्शविला. त्यांनी विचार मांडला की संस्थेच्या या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यास संस्था मागील १० वर्षाचा तसेच स्नेहसंम्मेलनाचा खर्च दाखविण्यास असमर्थ आहोत असे सांगून ती रक्कमही गंगाजळी टाकण्याचा प्रस्ताव कदाचीत पुढील सभेत आणण्याचा विचार करेल.

श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांनी सभासदांकडून आर्थिक वर्ष २०१६ – १७ पर्यंत येणे असलेली वार्षिक वर्गणीची रक्कम टप्याटप्याने वसुल करण्यात यावी असा मुद्दा मांडून जेष्ठ नागरीक, स्त्रिया व नोकरी न करणारी तरुण मुलं यांस वार्षिक वर्गणीत ५०% सूट देण्यात यावी अशी सूचना केली.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी मुद्दा मांडला की संस्था आकारत असलेली प्रवेश फी रु.१/- तसेच वार्षिक वर्गणी रु.६०/- हि सध्याच्या काळात नगण्य आहे व ती भरण्यास कोणही सभासदास भार वाटू नये परंतू संस्था ही ग्रामस्थांच्या हितासाठी असल्यामुळे कोणत्याही सभासदावर जबरदस्ती करून मागिल थकबाकी वसुल करणे अपेक्षित नाही व या वसुलीस होणारा खर्व व वेळ कदाचीत भराणा होणाऱ्या रक्कमेपेक्षा जास्त असू शकेल त्यामुळे मागिल थकबाकीचा ३०जून २०१७ पर्यंत भराणा न झाल्यास ती गंगाजळी टाकण्याची मंजूरी मागितलेली आहे. सभासदांकडून यावयाची मागील थकबाकी गंगाजळी टाकण्यापूर्वी कोणत्या सभासदाकडून यावयाची रक्कम गंगाजळी टाकण्यात येणार आहे याची माहीती सर्व सभासदांस देण्यात येईल.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे माहिती दिली कि संस्थेचे प्रथम ध्येय हे सभासदसंख्या वाढविणे हे असून आपण संघटीत झाल्यावरच संघटीत शक्तिच्या माध्यमातून विकासनिधी आपल्या वाडीसाठी खेचून आणू शकू. संघटनाबळ वाढल्यावरच फळसेवाडी हितकारी संस्थेच्या मतास गावपातळीवर व इतर ठिकाणी वज़न प्राप्त होऊ शकेल.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले वाढीव प्रवेश फी तसेच वाढीव वार्षिक वर्गणी या बाबींचा सभासद होण्यासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या ग्रामस्थांस अडथळा वाटू नये याविचाराने १८ वर्षावरील सर्व पुरुष, स्त्रिया तसेच लग्न होऊन सासरी गेलेल्या स्त्रिया यांस सभासद होण्यास आवाहन

करतांनाच ६० वर्षावरील वरिष्ठ ग्रामस्थांना / सभासदांना तसेच नोकरीधंदा करत नसलेल्या स्त्रियांना / तरूण मुलांना वार्षिक वर्गणी अनिवार्य न करता ऐच्छिक करण्याचे भान ठेवले आहे. संस्थेस असे वाटते कि या गटास वर्गणी ऐच्छिक केल्यामुळे त्यास संस्थेचे सभासदत्व नाकारण्याचे कारण उरणार नाही. तसेच जे आर्थिक सक्षम ग्रामस्थ संस्थेचे सभासदत्व स्विकारण्यास तयार नसतील त्यांस संस्थेबद्दल आस्था नाही हे स्पष्ट निर्दशनांस येऊ शकेल.

श्री दशरथ साटम यांनी पुढे सांगितले की वार्षिक वर्गणीची रक्कम नगण्य असल्याकारणे वर्गणीमार्फत संस्थेच्या वाडीच्या विकासासाठी निधी उभा करणे अपेक्षित नाही. या सर्व कारणांमुळे ऐच्छिक वर्गणी यामध्ये मोडणारया गटाला ५०% किंवा इतर कोणतीही सवलत देण्याचा विचार न करता वार्षिक वर्गणी पुर्णपणे ऐच्छिक करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

श्री प्रकास ज्ञानदेव राणे यांनी प्रस्तावातील अनिवार्य हा शब्द काढून ६० वर्षावरील वरिष्ठ ग्रामस्थांना / सभासदांना तसेच नोकरीधंदा करत नसलेल्या स्त्रियांना / तरूण मुले या गटात मोडणारया ग्रामस्थास ऐच्छिक वर्गणी अशी वाक्यरचना करण्यात यावी अशी सूचना केली.

सचिवांनी या चर्चेनंतर विषय क्रमांक ४ व्दारे मांडलेले प्रस्ताव मंजूरीकरीता ठेवल्यावर खालील बाबी मंजूर करण्यात आल्या.

<u>**मंजूर प्रस्ताव**</u>

१. फळसेवाडीतील सर्व ग्रामस्थांना (१८ वर्षावरील पुरुष, स्त्रिया तसेच लग्न होऊन सासरी गेलेल्या स्त्रिया) फळसेवाडी हितकारी संस्थेचे सभासद होण्याचे आवाहन करण्यात यावे.
२. आर्थिक वर्षे २०१७ – १८ च्या पहिल्या तिमाहीपर्यंत (म्हणजेच ३० जून २०१७ पर्यंत) सभासद नोंदणी मोहिम राबवून सभासद संख्या वाढविण्यात यावी.
३. दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी नोंदणी असलेल्या सभासदांकडून आर्थिक वर्ष २००५ – ०६ पासून ३१ मार्च २०१७ पर्यंत येणे असलेली ११ वर्षाची वार्षिक वर्गणीची जुन्या दराने होणारी रक्कम प्रत्येकी रु.६६०/- ३० जून २०१७ पर्यंत गोळा करण्यात यावी.
४. दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी नोंदणी असलेल्या सभासदांकडून आर्थिक वर्ष २००५ – ०६ नंतर येणे असलेली वार्षिक वर्गणीची थकबाकीची रक्कम ३० जून २०१७ पर्यंत जमा न झाल्यास सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर जमा न झालेली रक्कम गंगाजळी टाकण्यात यावी.
५. फळसेवाडी हितकारी संस्थेस आर्थिक पाठबळ देण्यासाठी आर्थिक वर्ष २०१७ – १८ पासून प्रवेश फी रु.१००/- तसेच वार्षिक वर्गणी रु.६००/- (रु.५०/- प्रतिमहीना) करण्यात यावी.
६. दिनांक १ एप्रिल २०१७ रोजी वयाची ६० वर्षे पुर्ण झालेल्या वरिष्ठ ग्रामस्थांना / सभासदांना तसेच नोकरीधंदा करत नसलेल्या स्त्रियांना आणि तरूण मुलांना वार्षिक वर्गणी ऐच्छिक करावी.

---

सचिवांनी कार्यपटलावरील विषय क्रमांक ५ सभेपुढे मांडताना ग्रामस्थांनी श्री संकेत रत्नाकर राणे यांचे मार्फत पाठविलेल्या निवेदनातील मुद्दा क्रमांक २ वाचून दाखविला. फळसेवाडीतील स्थानिक

ग्रामस्थांच्या या निवेदनपत्रात संस्थेच्या कार्यकरिणीवर सदस्यांची निवड करतांना ग्रामस्थांचा विचार घ्यावा हा मुद्दा रास्त असल्याचे मत सचिवांनी मांडले. सचिवांनी त्यानंतर ग्रामस्थांनी सुचविलेली तिन्ही नावे (१) श्री रामदास मारुती राणे, (२) श्रीमती अनुजा अरुण राणे आणि (३) श्री संकेत रत्नाकर राणे, मंजूरीकरीता सभेपुढे ठेवली.

यावर झालेल्या चर्चेत भाग घेताना श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांनी प्रस्ताव क्रमांक ५ मधील अनुक्रमांक ३ व ४ या मुद्यांस विरोध दर्शवून या महिलांची निवड कोणत्या निकषांवर केली गेली आहे अशी विचारणा केली. त्यापुढे राजकारणांत जसं स्त्रियांना पुढे करून पुरुषच कारभार बघत असतात त्याप्रमाणे या दोन स्त्रियांचा वापर तर होणार नाही अशी शंका उपस्थित केली. प्रथमत: या स्त्रियांना सभासदत्व देऊन त्यांना संस्थेच्या कार्यात सहभागी करून त्यांची क्षमता पाहणे आवश्यक नाही का ? अशी विचारणा करुन आतापर्यंत त्या स्वत: तसेच सौ चारुशिला मंगेश राणे या संस्थेच्या कार्यात सहभागी झाल्या असून देखील त्यांच्या नावाचा का विचार झाला नाही अशी विचारणा केली.

यावर स्पष्टीकरण देताना श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांस सांगण्यात आले की कार्यकारीणीवरील बदलाची हि फक्त सुरवात असून प्रस्तावात नमुद केल्यानुसार कमीतकमी २५% सदस्य गावी कायम वास्तव्यास असावे असे नमुद करण्यात आले आहे. या बदलाची सुरवात करताना प्रथमत: कमीतकमी २ महिला सदस्यांची (शक्यतो गावी कायम वास्तव्यास असलेल्या) नियुक्ती करण्याचा मानस असल्यामुळे श्रीमती अनुजा अरुण राणे आणि श्रीमती आकांक्षा अंकुश राणे यांची नावे कार्यकारीणीतर्फे सुचविण्यात आलेली आहेत. कार्यकारीणीतर्फे स्पष्ट करण्यात आले की श्रीमती तृप्ती अविनाश राणे सांगत असल्याप्रमाणे कार्यकारीणीने श्रीमती अनुजा अरूण राणे आणि श्रीमती आकांक्षा अंकूश राणे यांची कार्याकारीणीवर निवड केलेली नाही. आता स्थानिक ग्रामस्थांकडूनही आलेल्या निवेदनामध्ये या नावापैकी श्रीमती अनुजा अरूण राणे यांचे नाव ग्रामस्थानीही कार्यकारीणीवर आपला प्रतिनिधी म्हणून सुचविले आहे.

सचिवांनी पुढे सांगितले की प्रथमत: २ गावी कायम वास्तव्यास असलेल्या महिलांची निवड कार्यकारीणीवर करावयाची असल्यामुळे मुंबईस्थित महिला ग्रामस्थांच्या नावांचा विचार कार्यकारीणीने केला नाही. कार्याकारीणीवर कमीतकमी २ महिला सदस्यांची निवड करावयाचा मानस असल्यामुळे २ पेक्षा जास्तही महिला पुढील काळात आपली उमेदवारी जाहिर करून कार्यकारीणीवर निवडून येऊ शकतात. संस्थेच्या पुढील सर्वसाधारण सभेत श्रीमती तृप्ती अविनाश राणे किंवा इतर महिलांस आपली उमेदवारी दाखल करुन लोकशाहीच्या सनदशीर मार्गाने निवडून येऊन संस्थेच्या कार्यकारीणीवर महिलांची संख्या वाढविण्याची संधी असल्यामुळे त्यांचा आक्षेप त्यांनी मागे घ्यावा.

संस्थेच्या सर्व सभासदांस कार्यकारीणीवर काम करण्याची समान संधी असल्यामुळे संस्थेचे पदाधिकारी कोणत्याही सभासदाची / ग्रामस्थाची कार्यकारीणीवर वर्दी लावण्याच्या प्रयत्नास नसल्याचे श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांस स्पष्ट करण्यात आले. समविचारी आणि समध्येयाने पेटलेल्या तरून पिढीची कार्यकारीणीवर अत्यंत आवश्यकता असून वृध्द पिढीबरोबर काही काळतरी त्यांचा हात धरुन चालून संस्थेच्या चालीरितीची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

परंतू या सर्व खुलाश्यांने देखील श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांचे समाधान न झाले कारणे त्यांनी त्यांचा आक्षेप / विरोध कायम ठेवला.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सूचना केली की प्रस्तावात नमुद केल्यानुसार प्रथमत: कमीतकमी २ महिला सदस्यांच्या कार्यकारीणीवर निवडीचा (शक्यतो गावी कायम वास्तव्यास असलेल्या) मानस असल्यामुळे आणि स्थानिक ग्रामस्थांनी फक्त एकाच महिला सदस्यांचे नाव सुचविल्यामुळे संस्थेच्या पदाधिकारयांनी श्रीमती आकांक्षा अंकुश राणे यांस संस्थेच्या कार्यकारीणीवर काम करण्यास इच्छूक आहात का ? याची विचारणा करणे गरजेचे आहे.

श्री दशरथ साटम यांनी पुढे सांगितले की श्रीमती आकांक्षा अंकूश राणे कार्यकारीणीवर काम करण्यास इच्छूक नसल्यास दुसरया एखाद्या गावी कायम वास्तव्यास असलेल्या महिला ग्रामस्थाच्या नावाचा विचार व्हावा. श्रीमती अनुजा अरुण राणे यांचे व्यतिरिक्त कोणही ग्रामस्थ महिला कार्यकारीणीवर काम करण्यास इच्छूक नसल्यास मुंबईस्थित महिलांना कार्यकारीणीवर काम करण्यास इच्छूक आहात का ? याची विचारणा व्हावी.

सचिवांनी चर्चे अंती विषय क्रमांक ५ अन्वये मांडण्यात येणारे प्रस्ताव मंजूरीकरीता सभेपुढे ठेवल्यावर उपस्थित सभासदांनी श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांच्या विरोधाची नोंद घेऊन खालील प्रस्ताव समंत करून कार्यकारीणीस पुढील कार्यवाही करण्याची सूचना केली.

**<u>मंजूर प्रस्ताव</u>**

१. कार्यकारीणी सदस्यांची संख्या २ सदस्यांनी वाढवून १४ सदस्य करण्यात यावी
२. कार्यकारीणीमध्ये स्थानिक ग्रामस्थ आणि मुंबइस्थित नोकरदार ग्रामस्थ यांत समतोल व समन्वय साधण्यासाठी कार्यकारीणी सदस्य संख्येच्या २५% सदस्यांची निवड (सध्या ३ ते ४ सदस्य) गावी कायम वास्तव्य असणे हा निकष ठेवून करण्यात यावी. हा समतोल शक्य झाल्यास पुढील सर्वसाधारण सभेमध्ये किंवा लवकरात लवकर करण्यात यावा.
३. कार्यकारीणीवर कमीतकमी २ महिला सदस्यांची निवड (गावी कायम वास्तव्य असणे) हा निकष ठेवून करण्यात यावी.
४. ग्रामस्थांनी निवेदनामार्फत सुचविलेले श्रीमती अनुजा अरुण राणे यांचे नाव कार्यकारीणी सदस्य म्हणून मंजूर करण्यात आले. श्रीमती अनुजा अरुण राणे यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यावर पुढील सर्वसाधारण सभेत त्यांची निवड कार्यकारीणीवर करण्यात यावी.
५. श्रीमती आकांक्षा अंकूश राणे यांस कार्यकारीणीवर काम करण्यास इच्छूक आहात का ? याची विचारणा करण्यात यावी. त्यांचा कार्यकारीणीवर काम न करण्याचा विचार कायम असल्यास स्थानिक ग्रामस्थांबरोबर चर्चा करून दुसरया महिला ग्रामस्थाची निवड कार्यकरीणीवर करता येईल का ? याची चाचपणी व्हावी व त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.
६. ग्रामस्थांनी सुचविलेली इतर दोन नावे (१) श्री रामदास मारुती राणे आणि (२) श्री संकेत रत्नाकर राणे सभेस मंजूर असल्यामुळे त्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यावर त्यांस

कार्यकारीणीवर घेण्याची कार्यवाही सुरु करावी. कार्यकारीणी सदस्यांची संख्या वाढविण्याचा मानस नसल्यामुळे मुंबईस्थित कोणत्या कार्यकारीणी सदस्याची कार्यकारीणीवरून पायउतार होण्याची इच्छा आहे याची विचारणा करण्यात येऊन पुढील सर्वसाधारण सभेत या कार्यवाहीची पूर्तता करण्यात यावी.

७. श्री संकेत रत्नाकर राणे यांची कार्यकारीणीवर निवड होईपर्यंत संस्थेतर्फे करण्यात येणारया कामांचा पाठपुरावा करण्यासाठी संस्थेतर्फे त्यास प्रतिनिधीत्व देऊन कामाचा पाठपुरावा करण्यास सांगण्यात यावे.

८. वरील सर्व मंजूर प्रस्तावांवर करण्यात आलेल्या संपूर्ण कार्यवाहीची माहिती पुढील सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावी.

**ताजा कलम**

कुपनलिकेसाठी करण्यात येणारया सर्वेक्षणासाठी कार्यकारीणी सदस्य दिनांक २२ व २३ एप्रिल २०१७ या दिवशी गावी उपस्थित असल्यामुळे दिनांक २२ एप्रिल २०१७ रोजी ग्रामस्थांबरोबर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राच्यावेळी श्रीमती आकांक्षा अंकुश राणे उपस्थित नव्हत्या तरीही उपस्थितांस त्यांचे नावाबाबत विचारणा करण्यात आली असता श्री अंकुश मारुती राणे यांनी स्पष्टीकरण केले की त्यांचे घरातून श्री रामदास मारुती राणे यांची निवड कार्यकारीणीवर होत असल्याकारणे एकाच घरातील दोन व्यक्ती कार्यकारीणीवर नसाव्यात या विचारणे श्रीमती आकांक्षा अंकुश राणे या कार्यकारीणीवर काम करण्यास इच्छूक नाहीत.

उपस्थित ग्रामस्थांस स्पष्ट करण्यात आले की एका घरातून एकच व्यक्ती कार्यकारीणीवर असावी असा संस्थेचा नियम नाही. त्यापुढे आजही एका घरातील एकापेक्षा जास्त व्यक्ती कार्यकारीणीवर काम करत आहेत. कार्यकारीणीवर कार्यक्षम ग्रामस्थांची गरज असून कार्यक्षमता हा निकष महत्वाचा आहे. आजजरी स्थानिक महिला ग्रामस्थांस संस्थेच्या कामाचा अनुभव नसला तरीही कार्यकारीणीवर काम करण्याची संधी मिळत असल्यामुळे त्यांस अनुभव प्राप्त होईल. नवीन सदस्यांस मार्गदर्शन व सहाय्य करण्यासाठी अनुभवी कार्यकारीणी सदस्य असल्यामुळे नवीन सदस्यांनी चिंता करायचे कारण नाही. तसेच फळसेवाडी हितकारी संस्था हे कुटूंबाप्रमाणे असल्यामुळे चुका झाल्यास घाबरण्याचे कारण नाही. महिला ग्रामस्थांनी या संधीचा फायदा न घेतल्यास "अनुभव नाही तर कार्यकारीणी सदस्य होऊ शकत नाही आणि कार्यकारीणी सदस्य न झाल्यामुळे अनुभव नाही" अशी स्थिती होण्याचा संभव आहे.

परंतू श्री अंकुश मारुती राणे यांचेमार्फत श्रीमती आकांक्षा अंकुश राणे कार्यकारीणीवर काम करण्यास सध्यातरी इच्छूक नाहीत याचा पुनरुच्चार करण्यात आल्यामुळे उपस्थित कार्यकारीणी सदस्यांतर्फे इतर कोण ग्रामस्थ महिला कार्यकारीणीवर काम करण्यास इच्छूक आहेत का ? याची विचारणा करण्यात आली. परंतू कोणही ग्रामस्थ महिला पुढे न आल्यामुळे तसेच कोणही ग्रामस्थ महिलांचे नाव न सुचविले गेल्यामुळे सध्यातरी श्रीमती अनुजा अरुण राणे यांचे व्यतिरिक्त कोणही ग्रामस्थ महिला कार्यकारीणीवर काम करण्यासाठी इच्छूक नसल्याची नोंद घेण्यात आली. त्यानंतर उपस्थितांस सांगण्यात आले की रिक्त असलेल्या स्थानिक ग्रामस्थ महिला सदस्याचे जागेवर सध्यातरी एका मुंबईस्थित महिला ग्रामस्थाच्या नावाचा विचार करण्यात येईल.

---

सचिवांनी उपस्थितांस सांगितले की श्री दशरथ दत्ताराम साटम हे गेली ३ ते ४ वर्षे फळसेवाडी हितकारी संस्थेच्या संर्पकात आहेत. त्यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांचा विकास व सुखसोयीसाठी काही योजना संस्थेपुढे मांडल्या असून त्यांचा ते वेळोवेळी पाठपुरावाही करत आहेत. श्री दशरथ दत्ताराम साटम यांची धडपड पाहता असे क्रियाशील ग्रामस्थ कार्यकारीणीवर असावेत असे कार्यकारीणीस वाटते, याकारणे कार्यकारीणी श्री दशरथ दत्ताराम साटम यांचे नाव कार्याध्यक्ष या पदासाठी सुचवून उपस्थितांपुढे मंजूरीकरीता ठेवत आहे.

यावर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी त्यांचे मत मांडताना सांगितले की फळसेवाडी हितकारी संस्थेची सध्याची कार्यकारीणी १४ सदस्यांची असल्यामुळे (आजच्या सभेत मंजूर करण्यात आलेली २ अधिक पदे धरुन), त्यात आणखी एका पदाची (कार्याध्यक्ष) भर घालण्याची आवश्यकता वाटत नाही.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की संस्थेचा कार्यक्रम राबविण्यासाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व खजिनदार ही पदे असून त्याचेबरोबर १० कार्यकारीणी सदस्य आहेत त्यात अजून एक कार्याध्यक्ष पद निर्माण करताना या कार्याध्यक्ष पदाचे कार्यक्षेत्र / कृतीकक्षा ठरविणे गरजेचे आहे. तसेच या कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी काय याचीही माहीती नसल्यामुळे कृतीकक्षा व जबाबदारी याचा आराखडा ठरविल्याशिवाय कोणत्याही पदाची निर्मिती करणे हा चुकीचा पायंडा आहे.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की मला कोणत्याही पदाची अपेक्षा नाही. ग्रामस्थांसाठी काही काम करण्याची प्रामाणिक इच्छा असल्यामुळे मी संस्थेच्या पदाधिकारयांबरोबर काम करत आहे व राहीन याची आपण खात्री बाळगावी.

वरील बाबी नमुद करून श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी कार्याध्यक्ष हे नवीन पद निर्माण करून त्यावर माझी निवड करण्यात येऊ नये असे विनम्रपणे सांगितले.

यावर श्री विश्वास ज्ञानदेव राणे यांनी कार्याध्यक्ष पद हे आपण करत असलेल्या कार्याची पावती व आपला बहूमान असल्यामुळे उपस्थितांच्या इच्छेचा मान ठेवून हे पद स्विकारावे अशी विंनती श्री दशरथ साटम यांना केली.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी कार्याध्यक्ष पद स्विकारण्यास होकार दर्शविल्यावर उपस्थितांनी त्यांची फळसेवाडी हितकारी संस्थेचा कार्याध्यक्ष म्हणून निवड केली. आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर तसेच कामाची विभागणी करण्यात आल्यावर त्यांनी त्यांचा कार्यभार हाती घ्यावा अशी सूचना करण्यात आली.

---

सभेस असलेली उपस्थिती पाहता तसेच कार्यपटलावरील विषयांवर रात्री ९:०० वाजल्यानंतरही उपस्थितांचा शांतपणे चर्चेत सहभागी होण्याचा उत्साह पाहता आजही ग्रामस्थांमध्ये वाडीबद्दल आस्था असल्याचे निर्दशनास आले असे सांगून सचिवांनी आनंद व्यक्त केला.

सभेदरम्यान मांडण्यात आलेल्या सर्व प्रस्तावांवर साधकबाधक चर्चा करून उपस्थितांनी त्यास मंजूरी दिल्याबद्दल सदस्यांचे / ग्रामस्थांचे सचिवांनी आभार मानले.

ग्रामस्थांचे सहकार्य हिच संस्थेस मिळणारी संजीवनी असून ग्रामस्थांनी वेळोवेळी संस्थेस सूचना मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

सचिवानी त्यानंतर उपस्थितांचे पुन्हा एकदा आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

परिशिष्ठ क्रमांक १

# फळसेवाडी हितकारी संस्था

दिनांक १५ एप्रिल २०१७ रोजी आयोजित विशेष सर्वसाधारण सभेची उपस्थिती

## सभेस उपस्थित संस्थेचे सभासद

| क्रमांक | ग्रामस्थाचे नाव | क्रमांक | ग्रामस्थाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मंगेश मनोहर राणे (अध्यक्ष) | १३ | मंगेश काशिनाथ राणे |
| २ | सुनिल सदानंद राणे (सचिव) | १४ | प्रकाश ज्ञानदेव राणे |
| ३ | पांडूरंग सावजी राणे (सदस्य) | १५ | भरत गणपत राणे |
| ४ | अशोक दत्ताराम राणे (सदस्य) | १६ | भास्कर दौलत राणे |
| ५ | शंकर बाळकृष्ण राणे (सदस्य) | १७ | आनंद नारायण साटम |
| ६ | हेमंतकुमार रमेश राणे (सदस्य) | १८ | रविंन्द्र भगवान राणे |
| ७ | गुरुनाथ गणपत राणे (सदस्य) | १९ | सुरेश रघुनाथ राणे |
| ८ | दिलिप मधुकर राणे (सदस्य) | २० | रमेश गणपत राणे |
| ९ | सत्यविजय शिवराम राणे | २१ | संतोष श्रीधर राणे |
| १० | विश्वास ज्ञानदेव राणे | २२ | प्रविण मधुकर राणे |
| ११ | सुनिल विनायक राणे | २३ | लक्ष्मण शिवाजी राणे |
| १२ | मंगेश यशवंत सावंत | | |

## सभेस उपस्थित फळसेवाडीतील ग्रामस्थ

| क्रमांक | ग्रामस्थाचे नाव | क्रमांक | ग्रामस्थाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती तृप्ती अविनाश राणे | ८ | स्वप्निल पांडूरंग राणे |
| २ | रमाकांत बालशिवाजी राणे | ९ | संकेत रत्नाकर राणे |
| ३ | संदिप मोहन राणे | १० | श्रीमती मयुरी गौरव शेट्टी (मयुरी मंगेश राणे) |
| ४ | महेंन्द्र जीवत छेडा | ११ | रत्नकांत बालशिवाजी राणे |
| ५ | मयुर महेंन्द्र छेडा | १२ | रघुनाथ धोंडू राणे |
| ६ | स्वप्निल जयवंत राणे | १३ | दशरथ दत्ताराम साटम |
| ७ | रितेश अरुण राणे | | |

**वैयक्तिक कारणांमुळे सभेस उपस्थित राहू न शकलेले सभासद / ग्रामस्थ**

| क्रमांक | ग्रामस्थाचे नाव | क्रमांक | ग्रामस्थाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | उदय भगवान राणे (खजिनदार) | ४ | प्रविण प्रताप राणे |
| २ | जयवंत नाना राणे (सदस्य) | ५ | संजय मनोहर राणे |
| ३ | रंजन रावजी म्हसकर (सदस्य) | | |

**फळसेवाडीतील स्थानिक ग्रामस्थ ज्यांनी त्यांची मते / मुद्दे पत्राव्दारे सभेपुढे उपस्थित केले**

| क्रमांक | ग्रामस्थाचे नाव | क्रमांक | ग्रामस्थाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | रत्नाकर नाना राणे | ८ | रामदास मारुती राणे |
| २ | सिध्देश विजय साटम | ९ | वसंत भिकाजी राणे |
| ३ | तुकाराम विनायक राणे | १० | अरुण वासुदेव राणे |
| ४ | श्रीमती निर्मला बालशिवाजी राणे | ११ | मनोहर भिकाजी राणे |
| ५ | प्रकाश हरिश्चंन्द्र राणे | १२ | श्रीमती मनोरमा बाळकृष्ण राणे |
| ६ | अंकुश मारुती राणे | १३ | साबाजी विठोबा साटम |
| ७ | रमेश रघुनाथ राणे | | |

फळसेवाडी हितकारी संस्था

सभासदांची / ग्रामस्थांची सर्वसाधारण सभा
दिनांक १५ एप्रिल २०१७ रोजी

| अनु क्र | सभासदाचे नाव / ग्रामस्थाचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ ✓ | शंकर बाळकृष्ण राणे | S.B.Rane |
| २ ✓ | सत्यविजय शिवराम राणे | S.S. Rane |
| ३ ✓ | विश्वास ज्ञानदेव राणे | |
| ४ ✓ | हेमंतकुमार रमेश राणे | |
| ५ × | तृप्ती अविनाश राणे | |
| ६ ✓ | श्री. सुनिल विनायक राणे | सु.राणे |
| ७ × | रमाकांत बाळशिवाजी राणे | R.B.Rane |
| ८ × | संदीप मोहन राणे | |
| ९ ✓ | मंगेश यशवंत सावंत | M.Sawant |
| १० × | महेंद्र जिवण छेडा | |
| ११ × | मयूर महेंद्र छेडा | Mayur |
| १२ ✓ | मंगेश काशिनाथ राणे | |
| १३ × | स्वप्निल जयवंत राणे | S.J. Rane |
| १४ × | रितेश अरुण राणे | |
| १५ ✓ | प्रकाश ज्ञानदेव राणे | |
| १६ ✓ | भरत गणपत राणे | B.G.Rane |
| १७ ✓ | रघुनाथ गणपत राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्था

सभासदांची / ग्रामस्थांची सर्वसाधारण सभा
दिनांक १५ एप्रिल २०१७ रोजी

| अनु क्र | सभासदाचे नाव / ग्रामस्थाचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १८ | श्री. भास्कर दौलत राणे. | [illegible] |
| १९ | आनंद नारायण साटम | [illegible] |
| २० | श्री रवींद्र भगवान राणे | आर. बी. राणे |
| २१ | अशोक दत्ताराम राणे. | [illegible] |
| २२ | दिलिप मधुकर राणे. | [illegible] |
| २३ | स्वप्निल पांडुरंग राणे. | [illegible] |
| २४ | संकेत रत्नाकर राणे. | [illegible] |
| २५ | मयुरी भैरव शेट्टी (मयुरी मंगेश राणे) | MShetty... |
| २६ | रत्नकांत [illegible] राणे | [illegible] |
| २७ | सुरेश रघुनाथ राणे | [illegible] |
| २८ | रमेश जयवंत राणे | [illegible] |
| २९ | सुनिल सदानंद राणे | सुसराणे |
| ३० | पांडुरंग सावजी राणे | [illegible] |
| ३१ | मंगेश मनोहर राणे | [illegible] 15-04-2017 |
| ~~३२~~ | ~~अशोक दत्ताराम राणे~~ | |
| ३३ | संतोष श्रीधर राणे | [illegible] |
| ३४ | प्रविण मधुकर राणे | [illegible] |

फळसेवाडी हितकारी संस्था

सभासदांची / ग्रामस्थांची सर्वसाधारण सभा
दिनांक १५ एप्रिल २०१७ रोजी

| अनु क्र | सभासदाचे नाव / ग्रामस्थाचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| ३५ × | रघुनाथ धोंडु राणे | |
| ३६ ✓ | लक्ष्मण शि. (शिवाजी) राणे | |
| ३७ × | दशरथ दत्ताराम साटम | |
| ३८ | | |
| ३९ | | |
| ४० | | |
| ४१ | | |
| ४२ | | |
| ४३ | | |
| ४४ | | |
| ४५ | | |

उपास्थिती
सभासद 23
ग्रामस्थ 13
36

वैयक्तिक कारणांमुळे अनुपास्थित ५
ग्रामस्थांनी पत्राद्वारे निवेदन दिले 13
18

एकुण ५४

ग्रामस्थ

राहा. फळसेवाडी, पिसेकामते

ता. कणकवली, जि.सिंधुदुर्ग

दिनांक - १४/०४/२०१७

प्रति,

**मा. अध्यक्ष,**

फळसेवाडी हितकरी संस्था, मुंबई.

**विषय :-** दिनांक १५/०४/२०१७ रोजीच्या खास सभेबाबत...

**महाशय,**

१) आपण विषयानुरुप दिलेल्या मुद्याप्रमाणे. - आम्ही वाडीतील स्थानिक रहिवाशी आहोत. इकडील परिस्थिती, प्रसंग, गरजा यांना आम्ही तोंड देतो. अर्थात या सभेस आमचे विचार आम्ही पाठवत आहोत. गावी स्थावर मालमत्ता असलेले वास्तव्य नसलेले संस्थेचे पद सिद्ध सदस्य आहेत.

**मुद्दा क्र. १ :-** वाडीत कुठे पाणी साठा आहे. पाण्याची दिशा कशी आहे. स्थानिक संस्थेने विचारात घेणेचे गरजेचे आहे. झरीचा नाळवा व साटमांच्या पुर्वे कडील नाळवा, विहिर ४ वेळा बघितलेल्या जागेवर परत ३५,०००/- खर्च करणे चुकिचे आहे. याचा विचार व्हावा. (२ वेळा मशिन द्वारे, २ वेळा ज्योतीषी माणसांकडुन पाणी पाहिले आहे.) जास्त माहिती श्री. रत्नाकर नाना राणे देऊ शकतील.

**मुद्दा क्र. २ :-** संस्था मुंबईत आहे. वाडीचा विकास लोकमताचा विचार घेऊन पुढे जाताना परिसर लोकांच्या गरज आदीचा विचार करावा. संस्थेवर सदस्य घेताना आम्ही वाडी वस्तीत रहातो. आमचा विचार न घेता सदस्य निवडु नये आणि ते आताच घ्यावयाचे असतील तर तीन (३) सदस्य गावचे फळसेवाडीतील घ्यावे. ते खालीलप्रमाणे ,

१) श्री. रामदास मारुती राणे
२) सौ. अनुजा अरुण राणे
३) श्री. संकेत रत्नाकर राणे

असे सदस्य असावेत.

२) संस्थेत वयोवृद्ध सभांना उपस्थित न राहिलेले सदस्य त्यांच्या अडचणी विचारात घेऊन व विचार करुण पद रिक्त करा. संस्था रजिस्टर करताना आपली नियोजन वापरुन संस्था रजि. केली. संस्थेमध्ये सदस्यांची उपस्थिती नसेल तर त्यांना

बाजुस करा. संस्थेचे ~~सभासद~~ सदस्य प्रत्येक घरातील १ असावा. या मुद्याचा विचार करुन निर्णय घ्यावेत.

३) आपण संस्थेचे पदाधिकारी गावी येत आहात. तो दिवस व वेळ आम्हांस अगोदर कळवावी. आम्ही स्थानिक मंडळी तुमच्याकडे चर्चा सभा करु इच्छितो.

(या पत्राचा गैरसमज किंवा वाद विरोध असा भावार्थ करुन घेऊ नये.)

कळावे

ठिकाण :- फळसवाडी

दिनांक :- १४/०४/२०१७ आपले विश्वासु ग्रामस्थ

१) श्री. रत्नाकर नाना राणे [signature]
२) श्री. सिध्देश विजय सातम S.V.SATAM
३) " तुकाराम विनायक राणे T.V.Rane
४) श्रीम. निर्मळा बाळाशिवाजी राणे निर्मळा बा. राणे
५) श्री. प्रकाश हरिश्चंद्र राणे [signature]
६) श्री. अंकुश भाऊजी राणे
७) श्री. रमेश रघुनाथ राणे R.Rane
८) श्री. रामदास मारुती राणे RmRane
९) श्री वसंत भिकाजी राणे वसंत भि. राणे
१०) श्री अरुण वासुदेव राणे अरुण वा. राणे
११) श्री मनोहर भिकाजी राणे सुहासिनी म. राणे
१२) श्रीम. मनोरमा बाळकृष्ण राणे
१३) श्री साबाजी विठोबा सातम. [signature]

।। श्री गणेशाय नम:।।

**प्रति,**

**श्री. मंगेश म. राणे**

अध्यक्ष,

फळसेवाडी हितकरी संस्था

दिनांक – १५/०४/२०१७

**विषय – दि. १५ एप्रिल २०१७ रोजी 'फळसेवाडी हितकरी संस्थे'मार्फत घेतल्या जाणाऱ्या सर्वसाधारण सभेत मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावित मुद्यांवर (खालील पत्रात नमूद)संस्थेकडून सविस्तर लेखी खुलासा मिळावा यासाठीचे हे निवेदन पत्र.**

**महोदय,**

सर्वांत आधी काही विधायक कारणांसाठी 'फळसेवाडी हितकरी संस्थे'मार्फत'इतक्या मोठ्या प्रमाणात सर्वसाधारण सभा दि. १५ एप्रिल २०१७ रोजी आपण आयोजित केली आहे, यासाठी आपले व फळसेवाडी हितकरी संस्था कार्यकारिणी, सभासद यांचे मन:पूर्वक अभिनंदन. तसेच या सभेस श्री. दशरथ साटम आणि आपण स्वत: वैयक्तिक मला सभेत सहभागी होण्यासाठी ईमेलद्वारे निमंत्रित केले यासाठी आपल्या दोघांचेही मनापासून आभार.

खरं तर साधारण ५-६ वर्षापूर्वी शिरोडकर शाळेत झालेल्या मिटींगमध्ये लेखी व तोंडी स्वरूपात मी काही मुद्दे व सूचना मांडल्या होत्या, त्यांचा गांभीर्याने संस्थेने विचार केला नाही. त्यानंतर झालेल्या कोणत्याही सभेला आपण मला बोलावले नाही, किंबहुना मी दिलेल्या लेखी पत्राला आजतागायत कोणतेही लेखी उत्तर मिळाले नाही. त्यामुळे माझ्यासारख्या व्यक्तीला उपरोक्त उल्लेख केलेल्या सभेस उपस्थित राहणं सोयीस्कर वाटत नव्हतं. मी मागच्या मिटींगमध्ये काही मुद्दे उपस्थित केले होते.

१. णहिलांना ५० टक्के सहभाग द्यावा.
२. वार्षिक वर्गणी आकारली जावी.
३. मागील झालेल्या कार्यक्रमाचे हिशोब तातडीने सादर केले जावे.
४. लवकरात लवकर फळसेवाडी हितकरी संस्थेची फेरनिवडणूक होऊन तरूणांना अधिकाधिक संधी देण्यात यावी.

याव्यतिरीक्तही इतर अनेक मुद्दे व सूचना मी त्या मिटींगमध्ये केल्या होत्या. ज्यांचं पुढे काय झालं हे समजू शकलेलं नाही. अशा परिस्थितीत आपण पुन्हा नव्याने काही खर्चिक प्रस्ताव सादर करत आहात. त्यामुळे मनात काही प्रश्न निर्माण होत आहेत. ज्यांचा खुलासा संस्थेमार्फत केला जाणं अपेक्षित आहे. आपण श्री. राजेश अविनाश राणे यांना पाठविलेल्या ३-ते ४ पत्रांचा आधार घेत,

आमचे काही आक्षेप खाली नोंदवत आहे. आपल्याकडून अपेक्षा ही आहे की आपण खाली नमूद करत असलेल्या मुद्यांवर आम्हाला लेखी खुलासा द्याल.

**दि. ७ एप्रिल २०१७ रोजीच्या पत्रातील प्रस्तावित मुद्यांना अनुसरून,**

**पुढीलप्रमाणे प्रस्तावित मुद्यांवरील आक्षेप:-**

**प्रस्ताव क्रं. २** – यात आपण ब्राह्मणदेवाची विहीरीतून पाणीउपसा करून तसेच कूपनलिकेद्वारे गावाला पाणी पुरवण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. या अतिखर्चिक प्रस्तावालाच आमचा ठाम विरोध आहे. त्याची कारणं पुढीलप्रमाणे.

१. ख्काही वर्षापूर्वी ब्राह्मण देवाच्या विहीरीतील पाण्यावर पंप लावून पाणी योजना राबवण्याचा प्रस्ताव माझे वडील दिवंगत श्री अविनाश राणे व दिवंगत श्री मधुकर राणे तसेच तेव्हाच्या काही वडीलधाऱ्या मंडळींनी साफ नाकारला होता. याच मुद्यावर मी माझी आई श्रीमती जयश्री अविनाश राणे यांच्याशी चर्चा केली असता असे कळले की, ही विहीर अतिपवित्र मानली जाते. या जागेवर, ब्राह्मण देवावर अनेकांची दृढ श्रद्धा आहे. हे एक कारण आणि दुसरे म्हणजे जर पंप लावून पाणी उपसा सतत केल्याने झरे आटले व नष्ट झाले तर, ही मनात ऽसलेली भिती.

मला असे वाटते आपले वडीलधारी मंडळी खरचं दूरदृष्टीधारक होती. यातला धार्मिक भाग जरी आपण बाजूला केला तरी वैज्ञानिकदृष्ट्याही अशा प्रकारे सतत पाणीरूपी अमृत देणाऱ्या या विहीरीच्या पाण्याचा उपसा करणं अयोग्य आहे. यासाठी आपल्याच दि. १८ मार्च २०१७ च्या पत्रातील काही मुद्यांचा आम्ही आधार घेत आहोत.

**यातील मुद्दा क्रं. ४-५-६-७-८ याप्रमाणे जर विचार केला तर आपणच असं म्हटलं आहे. ब्राह्मण देवाच्या विहीरीतील पाण्याच्या उपशाआधी, विहीरीत ९ फूट म्हणजेच साधारण २३,००० लि. इतकं पाणी होतं. पाण्याच्या उपशानंतर आपल्याला तळाला २ मोठे झरे व इतर लहान-लहान जलधारा आढळल्या. गाळ काढल्यानंतर ४ तासांनी विहीर ३ फूट म्हणजेच जवळपास ७,५०० लि. इतकी भरली. त्यानंतर २० तासांनी दुसऱ्या दिवशी सकाळी आणखी ६ फूट म्हणजेच आपल्या अंदाजाने १५,००० लि. पाणी अधिक भरले.**

**आपणच मांडलेले हे मुद्दे ग्राह्य धरले, तर याचा अर्थ असा होतो की, साधारण पाणी उपश्यानंतर २४ तासात केवळ १५,००० लि. पाणी उपलब्ध झाले. म्हणजेच पाणी उपश्यापूर्वीचे विहीरीतील पाण्याचे प्रमाण होतं २३ हजार लि. पाणी व त्यानंतरचे प्रमाण होतं १५ हजार लि. पाणी...म्हणजेच यात जवळपास ८ हजार लि. च्या पाण्याची तफावत जाणवते.**

**कदाचित लिहीताना चुकुन असं झालं असेल तरी आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, विहीर भरायला २४ तास लागले. पहिल्या काही तासात पाणी भरण्याचा वेग अधिक होता, जो नंतर कमी झाला. त्याला शास्त्रीय कारण आहेत. या पाण्यातून रोज १० हजार लि. पाणी पंप लावू उपसा करण्याचा, त्याद्वारे गावाची तहान भागविण्याचा आपला विचार आहे. हा विचारच अतिशय घातक आहे. रोज १० हजार पाणी काढल्यानंतर विहीरीतील पाणी त्याच प्रमाणात पहिल्याइतके सातत्याने चार महिने भरले जाईल यासाठी आपल्याकडे कोणता शास्त्रीय आधार आहे. असेल तर त्याची प्रत आम्हाला सादर करावी.**

महोदय, अतिशय सहजरीत्या पाणीपुरवठा करण्याच खर्चिक उपाय आपण संस्थेमार्फत सुचवत आहात. त्याला काय शास्त्रीय आधार आहेत हे अजून समजलेले नाही. ज्या पाण्याचा एक थेंबही निर्माण करण्याची आपली क्षमता नसताना आहे त्या विहीरीच्या पाण्याचा उपसा करण्याचा आपल्याला कोणताही नैतिक अधिकार आहे असे आम्हाला वाटत नाही.

आपण म्हणत आहात त्याप्रमाणे असलेले २ झरे मोठे व इतर लहान झरे आपल्या पंपाद्वारे पाणी उपसल्याने आटले वा नष्ट झाले तर त्याची जबाबदारी आताचे संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारीणी वा इतर सदस्य जे हिरीरीने या योजनेची बाजू घेत आहेत, ते घेतील का, तसे लेखी आश्वासन आपण ग्रामस्थांना द्याल का, याचाही विचार केला जावा.

दुसरं असे निर्णय आपण कोणत्या याविषयाशी संबंधित व्यक्ती वा संस्था यांच्यामार्फत घेत आहात ते जाहीर करावे. ही संस्था वा व्यक्ती ग्रामस्थांना ब्राह्मणदेवाच्या विहीरीवरील पाणी उपश्यामुळे तिथले नैसर्गिक झरे, पाणीपातळी यात फरक होणार नाही, याचे प्रमाणपत्र देऊन ग्रामस्थांना आश्वस्त करेल का, करत असेल तर तसे नमूद करावे, आणि जर तसे लेखी आश्वासन वा प्रमाणपत्र सादर करण्यास फळसेवाडी हितकरी संस्था असमर्थ असेल तर कशाच्या भरवश्यावर आपण ही योजना रेटत आहात हे कळवावे.

दुसरं आपण या सर्वेक्षणाच्या कामाकरीता गोव्याच्या 'टेरा हायड्रेटीक सोल्युशन', दाबोलीन यांच्या स्मितेश तलावडेकर यांची नेमणूक केली. महोदय, आम्हाला आपल्याकडून हेही जाणून घ्यायचे आहे की,

१. याच संस्थेची निवड आपण सर्वेक्षणासाठी का केली.
२. याव्यतिरीक्त इतर कोणत्या संस्थेकडून आपण या कामाकरीता निविदा मागविल्या. जर तसं असेल तर प्रत्येक संस्थेने दिलेले अंदाजपत्र व त्यात ते काय काम करणार हे सादर करावे.
३. तसं नसेल तर सार्वजनिक काम करताना ज्या योजनेचा खर्च आपण अंदाजित ७ लाख दाखवत आहात, अशा महत्त्वाकांक्षी योजनेसाठी कामच्या निविदा का मागविल्या गेल्या नाहीत त्याचाही खुलासा करावा.
४. झरीवरील १० एकर जमिनीच्या सर्वेक्षणासाठी नियोजित खर्च ३५,००० रू. आपण दाखविला आणि तो खर्च फळसेवाडी संस्थेतील जमा रकमेतून करण्याचा विचार आपण मांडला. यासाठीही एकाच संस्थेचा आपण विचार केलात की इतरही संस्थेचा आपण विचार घेतलात हे स्पष्ट करावे. जर तसं नसेल तर परस्पर एकाच संस्थेची नेमणूक करून आपण गावकऱ्यांची फसवणूक करत आहात. सामाजिक कामात पारदर्शकतेला महत्त्व असतं. ते आपण का नाकारत आहात ह्याचाही खुलासा करावा.
५. दुसरं आतापर्यंतचा गेल्या १०-१२ वर्षातला संस्थेच्या कार्यकारीणीचा इतिहास पाहता अचानक जाग येऊन खुप मोठं भव्यदिव्य काम करत असल्याचा आभास निर्माण करून वातावरणनिर्मिती करून प्रत्यक्ष कामाला बगल दिल्याचेच निदर्शनास आले आहे. आताही गावात खुप मोठा दुष्काळ पडलाय आणि ताबडतोब ६-७ लाख रू. खर्च करून विहीर वा कुपनलिका, ब्राह्मणदेवाच्या विहीरीतील पाण्याचा उपसा असे अशास्त्रीय, अतार्कीक उपाय घाईघाईने करण्याचे का ठरत आहे, हे कळत नाहीय.

आम्हाला असे वाटते की, जिथे इतकी वर्ष गेली तिथे आणखी काही काळ..गावातल्या सर्वांना पाणी घरपोच मिळण्याची आपली कल्पना कितीही चांगली असली तरी त्यासाठीचे आपले उपाय मात्र भविष्याच्या दृष्टीने अतिशय घातक आहेत. आपण आपल्या आताच्या पाण्याच्या गरजेचा विचार करत आहात परंतु इतिहासातील व वर्तमान काळातीलही आजूबाजूच्या गावातील, प्रदेशातील इतिहास पाहता अशा पद्धतीने वारंवार पाणी उपसा झाल्याने तिथल्या भूगर्भीय पाण्याची पातळी एक तर आटली वा नष्ट झाली. तेव्हा त्याचाही विचार आपण करावा असं वाटतं.

आणखी एक उदाहरण देते, गावात श्री. दत्तात्रय साटम यांच्या मालकीची एक विहीर आहे. या विहीरीत पाण्याचा साठा हवा तसा होत नाही. आता आपणच विचार करा, आपण म्हणताय तसे कूपनलिका खोदली आणि २-४ वर्षानंतर तिथली पाणी आटलं तर इतके लाख खर्च व्यर्थ नाही का, आताच आपण अंदाजित ७ लाख खर्च मांडत आहात. उद्या जर दुर्दैवाने ब्राह्मण देवाच्या पाण्याचे स्त्रोत आपल्या योजनेमुळे आटले वा नष्ट झाले तर ४-५ वर्षांनी हाच खर्च २ ते ३ पटींनी वाढलेला असेल. त्याची जबाबदारी संस्थेचे पदाधिकारी घेतील का, याचाही खुलासा करावा.

याचाच अर्थ एकाच गावात भूगर्भातील पाण्याच्या पातळीत किती फरक आहे हे लक्षात घ्या. ब्राह्मण देवाच्या विहीरीची खोली साधारण १५ ते २० फूट माझ्या अंदाजाने आहे. साटमांची विहीर वा अलिकडेच गावात काही ठिकाणी खोदलेल्या कूपनलिका यांची खोली किती आहे याचाही विचार करावा. म्हणजेच आहे ते पाणी उपसण्याऐवजी आपण पाण्याच्या इतर स्त्रोताची चाचपणी करण अधिक सोयीस्कर होईल असे आमचे स्पष्ट मत आहे.

**केवळ तक्रारी करणं वा विरोध करणं हा हेतु नसल्याने व गावकऱ्यांची पाण्याची तहान लक्षात घेता काही पर्याय पुढे सुचवत आहे.**

**पर्याय १-** पाणी वाचवण्यासाठी, पाण्याची भूगर्भीय पातळी वाढावी यासाठी पहिल्यांदा प्रयत्न केले जावे.

**पर्याय २ —** माझ्या स्वत:च्या ओळखीचे असे १-२ तज्ञ आहेत. ज्यांचे प्रकल्प राज्य, देश व देशाबाहेर नावाजले गेले आहेत. त्यांचा याबातीत सल्ला घेणे. मी स्वत: तशी चर्चा आपले पत्र मिळाल्यानंतर त्यांच्याशी केली आहे. त्यानंतर काही गोष्टी जाणवल्या त्या अशा.

**पर्याय ३-** शेततळी, लहान मोठे बंधारे बांधण्यासाठी प्रयत्न करणे. पैकी शेततळी बांधण्यासाठी सरकारतर्फे अनुदान व प्रोत्साहन दिलं जातं. त्याची माहिती करून घेणे. दुसरं यासाठी एखादी एनजीओ, वा दानशूर व्यक्ती यांच्या माध्यमातून पैसा उभा करण्यासाठी प्रयत्न करणे.

(—————————————

**प्रस्ताव क्रं. ३** - यात आपण सार्वजनिक दिवाबत्तीच्या व्यवस्थेबाबत म्हटलं आहे. ज्याची गावाला खरंच गरज आहे. ही कल्पना चांगली आहे. तरी यात अधिकाधीक सरकारी योजना, सोलर वा पाण्याच्या विजेवर वीजनिर्मिती अशा पर्यायांचा विचार केला जावा असे वाटते. प्रत्येक ठिकाणी संस्थेतर्फे इतका खर्च करण्याची आवश्यकता आहे असे आम्हाला वाटत आहे.

**पर्याय १-** मला असे वाटते की, देणगीदारांच्या रूपाने आपल्याला जर काही सोलर कंदील वा त्या स्वरूपाचे टॉर्च स्वस्त दरात मिळवता आले तर प्रयत्न करायला हवा.

**पर्याय २ —** मराठी विज्ञान परिषद अशा पद्धतीचे सौर दिवे निर्माण करते. त्यांच्याशी वा अशा काही सामाजिक संस्थाशी याबाबत चर्चा करून तसे काही पर्याय मिळतात का याची चाचपणी आधी करायला हवी.

(——————————

**प्रस्ताव क्रं. ४** - यात आपण सभासद नोंदणी मोहिमेचा उल्लेख केला आहे.

महोदय,आपला आधीचा कारभारच स्वच्छ व पारदर्शक नसल्याने नवीन सभासदांना आपण यापुढील व्यवहार व योजना पारदर्शक होतील याचा विश्वास कसा देणार आहात याचाही खुलासा करावा. मी स्वत: वर उल्लेख केल्याप्रमाणे अनेक मुद्दे सभासद नोंदणीकरता

सुचविले. परंतु त्यांना पुढे कार्यान्वित करण्याचे कोणतेही कष्ट प्रस्थापित संस्थेमार्फत घेतले गेले नाहीत. जर आधीच्याच कार्यक्रमांचा व संस्थेच्या कामकाजाचा हिशोब आपण अजून सादर केलेला नाही.

वर आपण मंजूरीसाठी प्रस्ताव यातल्या ३ ऱ्या मुद्यात म्हणत आहात की ३० जून २०१७ पर्यंत जुन्या सभासदांकडून जमा न झालेली थकबाकीची वर्गणी साफ माफ करून गंगाजळी टाकणे

उद्या आपण १० वर्षाचा, स्नेहसंमेलनाचा हिशोब दाखवण्यास आम्ही असमर्थ आहेत असं म्हणत हीही रक्कम गंगाजळी टाका असं म्हणाल. तर ते कोणत्या निकषाने योग्य आहे. जर खरोखरीच संस्था मोठी करायची असेल तर टप्याटप्याने या सभासदांकडून आपण ही वर्गणी गोळा करायलाच हवी असं माझं वैयक्तिक मत आहे.

पुढचा मुद्दा क्रं. ४ मध्ये आपण जेष्ठ नागरिक, स्त्रिया, नोकरी न करणारे तरूण-मुलं यांच्याकडून वर्गणी ऐच्छिक असावी असं म्हणत आहात. त्याऐवजी त्यांच्याकडूनही वर्गणी आकारावी, फक्त ती ५० टक्केचं असावी असं मला वाटतं.

त्याचबरोबर जेष्ठ, तरूण, स्त्रिया-मुली यांना सहभागी करून घेण्यासाठी त्यांच्यासाठी काही सामाजिक, वैद्यकीय, सांस्कृतिक कार्यक्रम संस्थेकडून घेतले जावेत असं वाटतं.

आणखी एक मुद्दा आपण नवीन पिढीला गावी न येण्याबद्दल दोषी ठरवले आहे. मला असं वाटतं तरूण मुलं का येत नाहीत याचा विचार आपल्यासारख्या कार्यकारीणीतील जेष्ठांनी करायचा आहे. गावचा एकच रस्ता जो गेली १० वर्षात आपण पूर्ण करू शकला नाहीत. पाणी योजनेच्या उथळ योजना, २-३ स्नेहसंमेलन, स्नेहभोजन यापलिकडे आपण त्या तरूणांना संस्थेमार्फेत काय सुविधा दिल्या आहेत. कोणतं पोषक सांस्कृतिक, सामाजिक वातावरण दिलं आहे याचाही एकदा विचार करावा.

आपण मला दिलेल्या ईमेलमध्ये धडाडीच्या कार्यकर्त्याची गरज आहे असं म्हटलं आहे. मी २००४ पासून गेली १२-१३ वर्ष संस्थेच्या अनेक सभांमध्ये सक्रीय सहभाग घेतला आहे. अनेक उपक्रमांमध्ये काम केलं आहे. त्यानंतरही आपण माझ्या कोणत्या सूचनांचा गंभीरपणे विचार केला आहे. जर आपण तो करणार नसाल, तरूणांना संधी देणार नसाल तर संस्थेचे काम पाहणारी नवीन पिढी आपण कशी घडवणार आहात याचाही खुलासा करावा.

कोणावरही वैयक्तिक टिका करण्याची आमची इच्छा नाही, तरीही काही प्रश्न उपस्थित राहतात, गेल्या १० वर्षात संस्थेची पुनर्रचना आपण का केली नाहीत. दरवेळी प्रत्येक कार्यक्रमात काही ठराविक लोक, वा गट यांचाच वरचष्मा का राहतो. कदाचित आपण म्हणाल की लोक येत नाहीत. तर पुढे जाऊन असं म्हणावसं वाटतं लोकांमध्ये ती मानसिकता तयार करण्याची जबाबदारी कोणाची आहे.

**माझे वडील व इतर काही जेष्ठ मंडळी जेव्हा संस्थेत काम करत होती तेव्हा त्यांना जवळून पाहण्याचे भाग्य मला लाभले आहे. डिलाइट रोडचे प्रतापकाकाचे वडील वा तो स्वत: असेल, आबा, नाना, वासु काका (आजोबा), साटम आजोबा अशी कितीतरी मंडळी मी पाहिली आहेत. त्यांच्यातही मतभेद होत होते. परंतु वरिष्ठांचा मान राखला जात होता. वरिष्ठांच कामकाजही चोख व पारदर्शी होतं. प्रत्येकाला एकमेकांबद्दल आदर व प्रेम होतं. आता मात्र गेल्या काही वर्षात ती भावना कुठेतरी लोप पावून मी माझं कुटुंब कसं मोठं होईल. आमचं नाव, आमचं पद असं व्यक्ती वा गटकेंद्रीत कारभार पाहायला मिळत आहे. जो गावाचे सामाजिक, सांस्कृतिक हित पाहता अत्यंत घातक आहे. तेव्हा आपण या साऱ्याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता आली आहे.**

---

**प्रस्ताव क्रं. ५-** यात आपण स्थानिक ग्रामस्थांच्या फळसेवाडी हितकरी संस्थेत क्रीयाशील सहभागाविषयी म्हटले आहे. यात प्रामुख्याने कार्यकारीणी सभासद संख्या १२ वरून १४ करणं त्यात गावच्या २ महिलांचा सहभाग घेण्याविषयी आपण म्हटलं आहे.

महोदय, आपल्या या प्रस्ताव क्रमांकातील मंजूरीसाठीच्या मुद्दा क्रं ३ व ४ आमचा तीव्र विरोध आहे. आपण श्रीमती अनुजा अरूण राणे व आकांक्षा अंकुश राणे या दोन महिलांची वर्णी या ठिकाणी लावत आहात. त्यालाच माझा वैयक्तिक विरोध आहे. एक स्त्री असूनही मी हा विरोध करत आहे असं आपल्याला वाटू शकेल. परंतु एक स्त्री आहे म्हणूनच मी या दोघींच्या नावाला थेट कार्यकारणीत सभासद करण्याला तीव्र विरोध करत आहे.

गेल्या १० वर्षापासून मी संस्थेत स्त्रियांचा समान सहभाग असावा असं म्हणत आले आहे. परंतु याआधी त्याचा कसलाच विचार केला गेला नाही आणि आता अचानक या दोन महिलांची आपण काही लोकांशी विचारविनिमय करून वर्णी लावत आहात. ही बाब मनात संशय निर्माण करते. राजकारणात जसं स्त्रियांना पुढे करून मागे पुरूषच कारभार बघत असतात, त्याप्रमाणे या दोन स्त्रियांचा वापर तर केला जात नाही ना अशी शंका मनात उपस्थित होत आहे.

त्याची कारणंही तशीच आहेत मुळात या दोन महिलांची थेट वर्णी आपण कोणत्या निकषांवर लावत आहात हे कळत नाहीय. केवळ त्या गावी कायम वास्तव्यास आहेत. हा एकच निकष असेल तर तो साफ बिनबुडाचा आहे.

१. या दोन महिलांना सभेचा वा संस्थेच्या कामकाजाचा, वा इतर सामाजिक कामाचा काय अनुभव आहे.
२. केवळ ग्रामीण भागात काही सार्वजनिक उत्सवात काही कामात सक्रीय होणं म्हणजे अनुभव आहे का, दुसरं त्यांनी काम करावं यासाठी त्या कार्यकारीणीत असाव्यात याची गरजच काय, जर तसं असेल तर त्यांना सर्वसाधारण सभासदत्व देऊन आधी सुरूवातीला त्यांना हळूहळू संस्थेच्या सभांमध्ये, कार्यक्रमामध्ये हळूहळू सहभागी करून घेणं, त्यांची क्षमता तपासणं अधिक सोयीस्कर वाटत नाही का.
३. तुम्हाला इतकाचं महिलांच्या सहभागाविषयी वाटत होतं. तर मी स्वत: गेली १२-१३ वर्ष संस्थेत काम करत आहे. सभेत सहभागी झाले आहे. सौ. चारूशीला मंगेश राणे यांनीही वेळोवेळी संस्थेच्या काही कामात मदत केली आहे. अशा स्त्रियांचा विचार न करता आपल्याला थेट गावातील या दोन महिलांचा विचार करावा वाटला याचं स्पष्टीकरण द्यावं. (असं लिहिलं आहे म्हणजे मला संस्थेत घ्या, असा माझा आग्रह नाही आणि मागणीही नाही, कृपया गैरसमज नसावा. केवळ आपला कारभार कसा चालतो हे दाखविण्यासाठी हे लिहावं लागलं आहे)
४. जर सभासद संख्या वाढवायचीच असेल तर तिथे खरोखरीच काम करणाऱ्या लोकांची निवड का केली जाऊ नये. गेली काही वर्ष आमच्या निरिक्षणानुसार श्री दशरथ साटम हे संस्थेसाठी पोटतिडकीने चांगलं काम करत आहेत. वैयक्तिक माझा त्यांच्याशी फारच कमी संपर्क आला आहे. तरी चांगल काम कुठेतरी पोहचतचं असत. त्याअनुषंगाने आपण श्री दशरथ साटम यांचा कार्यकारीणीमध्ये का विचार केला नाही, त्यांनी स्वत: वेळोवेळी संस्थेला आर्थिक मदतही केली आहे. असं असताना मी तर म्हणेन त्यांचा संस्थेच्या खजिनदारपदी का विचार करू नये. त्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रताही या पदासाठी अतिशय अनुकुल आहे.
५. गेल्या १० वर्षात फारसं काहीही काम करू न शकलेल्या, हिशोबही न मांडू शकलेल्या संस्थेच्या आधीच्या खजिनदारांनी राजीनामा का देऊ नये..कोणत्या निकषावर अजूनही त्यांना या पदी आपण कायम ठेवलं आहे. असंही सार्वजनिक न्यासाप्रमाणे एकाच घरातील जवळच्या नात्यातील ३ व्यक्ती, श्री. सुनिल सदानंद राणे, श्री. उदय भगवान राणे व श्री. उत्तम वामन राणे कार्यकारणीत कशा याचंही स्पष्टीकरणं मिळावं. हिशोब सादर न केल्याने त्याची नैतिक जबाबदारी घेऊन संस्थेचे सद्य खजिनदार श्री. उदय भगवान राणे यांनी राजीनामा देणं अधिक संयुक्तिक वाटत नाही का, यावर आपले मत द्यावे.

८—————————————————————

पुन्हा एकदा प्रस्ताव क्रं १ च्या काही मुद्यांकडे येते. जाणीवपूर्वक हा मुद्दा मी खाली घेत आहे.

**प्रस्ताव क्रं. १** - यात आपण ग्रामस्थांच्या वाहनरस्त्यांच्या व रस्त्याच्या डांबरीकरणाच्या मुद्यांचा उल्लेख केला आहे. यात मंजूरीसाठी प्रस्ताव क्रं. १आणि २ मध्ये आपण मा. आमदार श्री नारायणराव राणे व मा. आमदार श्री नितेश राणे यांच्याकडे संबंधित कामाच्या निवेदनाचा मुद्दा मांडला आहे.

ज्या गावात दोन आमदार व एक उपसरपंच (माझ्या माहितीप्रमाणे) असताना गावच्या अर्धवट राहिलेल्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम गेल्या १० वर्षात का रखडले याचा गांभीर्याने विचार केला जावा. वैयक्तिक हेवेदावे, अहंकार यात सामान्य ग्रामस्थांची पिळवणुक करण्याचा कोणालाही नैतिक अधिकार नाही. यात संस्थेचे पदाधिकारी,सभासद कुठे कमी पडले याचं कठोर आत्मपरिक्षण करतील का.

यातच पुढे मुद्दा क्रं. ४ मध्ये आपण संस्थेचे कार्यकारीणी सभासद श्री. अभयनाथ भगवान साटम हे संस्थेच्या कामात अडथळा आणत असल्याने त्यांना समज देणे वा त्यांच्यावर संस्थेमधील त्यांचे सभासदत्त्व करण्याची कारवाई करण्याची आपण भाषा वापरली आहे. जर हाच निकष लावायचा असेल तर तमाम ग्रामस्थांच्या विश्वासास पात्र न ठरलेल्या सध्याच्या पदाधिकारी व कार्यकारीणीच्या इतर सभासदांबद्दल आपले मत काय हेही स्पष्ट करावे. विविध आर्थिक व वयाच्या ग्रामस्थांसाठी कोणतेही ठोस काम न करणाऱ्या फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारणीवर काय कारवाई करण्यात यावी असे आपल्याला वाटते. किंबहुना ही कार्यकारणी वर्षानुवर्ष तशीच ठेवण्यात आपण कोणते पारदर्शी काम केले आहे, तेही कळावे.

खरं तर कोणत्याही सामाजिक संस्थेत नियमाप्रमाणे ३ वा ५ वर्षानंतर कार्यकारिणीच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येतात. आपल्याकडे गेल्या १० ते १५ वर्षात अशा निवडणुका झाल्या का , जर झाल्या असतील तर त्याचा तपशील देण्यात यावा. जर अशा पारदर्शी निवडणुका झाल्या नसतील तर त्या का झाल्या नाहीत त्याचीही कारणं देण्यात यावीत. जर अशाच पद्धतीने मनमानी करत आपल्याला संस्थेचा कारभार काही लोकांपुरताच मर्यादीत ठेवायचा असेल तर अशा सभांची गरजच काय असा प्रश्न पडतो.

एकंदरीतच आपली २ ते ३ पत्र नीट वाचल्यानंतर जी गोष्ट जाणवली ती ही की, संस्थेच्या काही लोकांच्या मनात कितीही चांगले विचार असले तरी ते विचार मांडतना पक्की बैठक नसल्याने आतापर्यंत संस्थेतर्फे कोणतेही मोठे काम आपण करून शकलो नाही.

आणखी एक गोष्ट म्हणजे या सर्व पत्रांचा अभ्यास केला असता असे जाणवते की, यातील सर्वच प्रस्तावित मुद्दे हे जवळजवळ अंतिम टप्प्यात आहेत. यातल्या भाषेवरून तरी ही गोष्ट सतत जाणवत राहते. एका ठराविक गटाने मुद्दे मांडायचे, व बाकींच्यांनी ते पुढे रेटायचे. या पत्रात पारदर्शकतेच्या अनेक गोष्टींचा अभाव आढळतो. त्याचप्रमाणे कोणतेही निर्णय घाईघाईने घेतले जातात ते टाळता येणार नाही का,याचाही विचार आपण करावा. एकूण सर्वच मुद्यात आपण वर्तमानाचा अधिक विचार करता आहात. परंतु आपल्या निर्णयाने पुढे येणाऱ्या पिढ्या आणि त्यांच्या भविष्यासाठी आपण काय तरतूद करतो आहोत याचा नीटसा विचार केलेला दिसत नाहीय. आपल्या पूर्वजांना तो विचार केला, म्हणूनच शाळा, आणि पाणी यासारख्या जीवनावश्यक वस्तू उपभोगण्याचे, त्यातून समृद्ध होण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे. मात्र आज आपण घेत असलेल्या निर्णयाने ५० वर्षानंतर काय स्थिती असेल याचा यात्किंचितही विचार आपल्या मनात डोकावत नाही याचा खेद वाटतो.

खुप विस्ताराने पत्रात मुद्दे मांडण्याचा प्रयत्न मी केला आहे. यात काही त्रुटी राहू शकतात. संस्थेच्या पदाधिकारी व कार्यकारणी सदस्यांबद्दल माझ्या मनात कसलाही रोष नाही. असलीच तर खंत आहे. सुशिक्षित असूनही आपण अजून एका विशिष्ट चक्रात काम करत आहोत याची. मी वैयक्तिक कोणावरही नाराज नाही. तरी गावाचे सामाजिक हित पाहता अतिशय स्पष्ट काही लिहिण्याची वेळ आली आहे असं वाटलं.

जर लहान मुलं चुकली तर मोठी माणंस त्यांना ती चुक दाखवतात व ती सुधारतातही. त्यांच्या मनाचा हा मोठेपणा असतो. त्याचप्रमाणे कधी कधी मोठी माणंसही भरकटु शकतात. आपल्याकडे तसं होतंय असं वाटून काही गोष्टी स्पष्ट बोलण्याची हिम्मत इथे केली आहे. काहीजणांना हा माझा आगावूपणा वाटेल.. काहीजणांना नसत्या उठाठेव वाटतील. पण तरी जमलेली सारीच वडिलधारी मंडळी माझ्य लिहिण्यामागच्या भावना समजून घ्याल अशी आशा नव्हे विश्वास वाटतो आहे.

खरं तर गेल्या ३ वर्षात मी ३ दिवसही गावात राहिले नाही. त्याची कारण इथे चर्चा करत नाही. तरीही या गावच्या विशेषत: माझ्या लहानपणीच्या खुप सुंदर आठवणी माझ्याकडे आहेत. माझे वडिल श्री अविनाश राणे यांनी मला गावच्या सभेत जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्यामुळेच आज समर्थपणे काम करण्याचे बळ मला मिळाले आहे. माझ्याचप्रमाणे येणाऱ्या पिढ्यांना आपल्या गावच्या काय सुंदर आठवणी आपण देणार आहोत. याचा विचार करणं अधिक गरजेचं आहे. आणि त्यासाठी जर कोणते काम तात्काळ स्वरुपात करायला हवं असं मला वाटतं तर ते आहे, 'फळसेवाडी हितकरी संस्थे'च्या कार्यकारणीत आमुलाग्र बदल करण्याचे. संस्थेच्या घटनादुरूस्तीची, पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकांचा आधी विचार व्हायला हवा. नवीन दमाचे, काही करू पाहणारे लोक कार्यकारणीवर यायला हवेत असं आमचं प्रांजळ मत आहे. तेव्हा याबाबत आपले मत स्पष्ट करावे.

याचा अर्थ संस्थेमधील लोक वाईट आहेत, असाही नाही. तर सध्या पदावर कार्यरत असलेल्या वडीलधाऱ्या मंडळींनी तरूणांना संधी देऊन, संस्थेत त्यांनी सल्लागार म्हणून राहावे. जेणेकरून त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा फायदा नवीन पिढीला होऊ शकेल.

पुन्हा एकदा आपण मला सभेस निमंत्रित केलात यासाठी आपले मनपूर्वक आभार. काही कमीजास्त शब्द गेले असल्यास मोठ्या मनाने आपण मला माफ करावे, व या पत्रातील वरील सर्व मुद्यांचा विचार करून त्यांचा लेखी खुलासा मला देण्याची कृपा करावी. त्याचप्रमाणे आपण या मुद्यांचा गांभीर्याने विचार करून योग्य ती पावलं उचलाला अशी आशा आहे. आपल्या लेखी उत्तराची प्रतिक्षा राहील. तरी लवकरात लवकर यावर खुलासा करणारे आपले पत्र मला मिळावे ही नम्र विनंती. कळावे. धन्यवाद.

**आपली नम्र,**

**तृप्ती अविनाश राणे**

**१/३४, कोंडाजी बिल्डींग,**

**जे. वा. रोड, परेल, मुं. १२**

**मो.- ९८६९६९५३१५**